
# || उपासना ||




# श्री गजानन सेवा

सॅन–फ्रांसिस्को बे एरिया,
कॅलिफोर्निया,अमेरिका

# श्री गजानन महाराज



सॅन-फ्रांसिस्को बे एरिया, कॅलिफोर्निया, अमेरिका

# ✲ अनुक्रमणिका ✲


- श्री गणपत्यथर्वशीर्षम् १
- श्री गजानन महाराज आवाहन ४
- नामजप ५
- श्री गजानन महाराजांचे २१ नमस्कार (दुर्वांकुर) ६
- श्री गजानन महाराज अष्टक ९
- श्री गजानन महाराज भजन १०
- श्री गजानन महाराज अभंग ११
- श्री गजानन बावन्नी १२
- श्री गजानन चालीसा १५
- अष्टोत्तरशत नामावली २०
- श्रीराम वंदना २२
- महाराजांचे आवडते भजन २४
- आरती संग्रह २५
- प्रार्थना, प्रदक्षिणा, क्षमा प्रार्थना ४३
- श्री गजानन महाराज स्तुती स्तोत्र ४४
- प्रदक्षिणा ४५
- प्रसाद हा मज द्यावा ४६
- भूपाळी ४७
- शेजारती ४८
- श्री गजानन प्रार्थना स्तोत्र ४९
- श्री गजानन महाराज प्रगट दिन उत्सवाबद्दल थोडेसे ५८
- उत्सव आरती ५९

# ❋ श्री गणपत्यथर्वशीर्षम् ❋

।। अथ गणपत्यथर्वशीर्ष- प्रारंभः।।

।। श्रीगणेशाय नमः।।

ॐ भद्रं कर्णेभिः श्रृणुयाम देवाः। भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः।
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः। व्यशेम देवहितं यदायुः ।।१।।
ॐ स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः। स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः।
स्वस्ति नस्तार्क्ष्योअरिष्टनेमिः। स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ।।२।।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।

ॐ नमस्ते गणपतये।
त्वमेव प्रत्यक्षं तत्वमसि। त्वमेव केवलं कर्ताऽसि। त्वमेव केवलं धर्ताऽसि।
त्वमेव केवलं हर्ताऽसि। त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि। त्वं साक्षादात्माऽसि नित्यम् ।।१।।
ऋतं वच्मि। सत्यं वच्मि ।।२।।
अव त्वं माम्। अव वक्तारम्। अव श्रोतारम्। अव दातारम्। अव धातारम्।
अवानूचानमवशिष्यम्।
अव पश्चातात्। अव पुरस्तात्। अवोतरातात्। अव दक्षिणात्तात्। अव चोर्ध्वात्तात्।
अवाधरात्तात्। सर्वतो मां पाहि पाहि समन्तात् ।।३।।
त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मयः। त्वमानन्दमयस्त्वं ब्रह्ममयः।
त्वं सच्चिदानन्दाद्वितीयोऽसि। त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि।
त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि ।।४।।
सर्वं जगदिदं त्वत्तो जायते। सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति।
सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति। सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति।
त्वं भूमिरापोऽनलोऽनिलो नभः। त्वं चत्वारि वाक्पदानि ।।५।।
त्वं गुणत्रयातीतः। त्वं वस्थात्रयातीतः । त्वं देहत्रयातीतः। त्वं कालत्रयातीतः।

त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यम्। त्वं शक्तित्रयात्मकः।
त्वां योगिनो ध्यायन्ति नित्यम्।
त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वं इन्द्रस्त्वं अग्निस्त्वं
वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुवःस्वरोम् । ब्रह्मभूर्भुवःस्वरोम्
गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिं तदनन्तरम्। अनुस्वारः परतरः।
अर्धेन्दुलसितम्। तारेण ऋद्धम्। एतत्तव मनुस्वरूपम्।
गकारः पूर्वरूपम्। अकारो मध्यमरूपम्। अनुस्वारश्चान्त्यरूपम्। बिन्दुरूत्तररूपम्।
नादः सन्धानम्। संहितासन्धिः। सैषागणेशविद्या।
गणकऋषिः। निचृद् गायत्री छन्दः। गणपतिर्देवता।
ॐ गं गणपतये नमः ।।७।।
एकदन्ताय विद्महे। वक्रतुण्डाय धीमहि। तन्नो दन्ती प्रचोदयात् ।।८।।
एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम् । रदं च वरदं हस्तैर्बिभ्राणं मूषकध्वजम्।
रक्तं लंबोदर शूर्पकर्णकं रक्तवाससम्। रक्तगन्धानुलिप्ताङ्गं रक्तपुष्पैः सुपूजितम्।
भक्तानुकंपिनं देवं जगत्कारणमच्युतम्। आविर्भूतं च सृष्ट्यादौ प्रकृतेः पुरूषात् परम्।
एवं ध्यायति यो नित्यं स योगी योगिनां वरः ।।९।।
नमो वातप्रतये। नमो गणपतये। नमः प्रमथपतये।
नमस्ते अस्तु लम्बोदरायैकदन्ताय विघ्ननाशिने शिवसुताय श्रीवरदमूर्तये नमो नमः ।।१०।।

## ✻ फलश्रुती ✻

एतदथर्वशीर्षं योऽधीते । स ब्रह्मभूयाय कल्पते । स सर्वतः सुखमेधते । स सर्व विघ्नैर्नबाध्यते ।
स पंचमहापापात्प्रमुच्यते । सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति ।
प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति । सायंप्रातः प्रयुंजानो अपापो भवति ।
सर्वत्राधीयानोऽपविघ्नो भवति । धर्मार्थकाममोक्षं च विंदति ।
इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयम् । यो यदि मोहाद्दास्यति स पापीयान् भवति ।
सहस्रावर्तनात् यं यं काममधीते तं तमनेन साधयेत् ॥११॥

अनेन गणपतिमभिषिंचति स वाग्मी भवति । चतुर्थ्यामनश्नन् जपति स विद्यावान् भवति ।
स यशोवान् भवति । इत्यथर्वणवाक्यम् । ब्रह्माद्यावरणं विद्यात् न बिभेति कदाचनेति ॥१२॥
यो दूर्वांकुरैर्यजति स वैश्रवणोपमो भवति । यो लाजैर्यजति स यशोवान् भवति ।
स मेधावान् भवति । यो मोदकसहस्रेण यजति स वाञ्छितफलमवाप्नोति ।
यः साज्यसमिद्भिर्यजति स सर्वं लभते स सर्वं लभते ॥१३॥
अष्टौ ब्राह्मणान् सम्यग्ग्राहयित्वासूर्यवर्चस्वी भवति ।
सूर्यग्रहे महानद्यां प्रतिमासंनिधौवा जप्त्वा सिद्धमंत्रो भवति । महाविघ्नात्प्रमुच्यते ।

महादोषात्प्रमुच्यते । महापापात् प्रमुच्यते ।
स सर्वविद्भवति स सर्वविद्भवति । य एवं वेद इत्युपनिषत् ॥१४॥

॥ शांति मंत्र ॥

ॐ सहनाववतु । सहनौभुनक्तु ।
सह वीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ।
ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा । भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।

स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः। व्यशेम देवहितं यदायुः ।
ॐ स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः । स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।
स्वस्तिनस्ताक्ष्र्यो अरिष्टनेमिः । स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ।

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।
॥ इति श्रीगणपत्यथर्वशीर्षं समाप्तम् ॥

**अनंतकोटी ब्रह्माण्डनायक महाराजाधिराज योगिराज**
**परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी**
**समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय।।**

* * *

# ✻ श्री गजानन महाराज आवाहन ✻

गजानना या करी आवाहन आसनस्थ व्हावे।
शुद्धोदक हे पाद्य अर्घ्य अन् आचमना घ्यावे।
दुध दही घृत मध शर्करा पंचामृत स्नान।
अथर्वशीर्षे रुद्र सुक्त सह श्री सुक्ते स्नान।।

जरतारीची शाल अर्पिली यज्ञोपवितही तसे।
सर्वांगाला परिमल भाळी तिलक केशरी असे।
फुले सुगंधी हिरव्या नाजूक दूर्वा एकवीस।
धूप निरंजन चून भाकरी ते नैवेद्यास।।

कर्पूरर्ती मंत्रपुष्प घ्या प्रदक्षिणा नमन।
चिलिम दिधली सेवा करितो अनन्य मी शरण।
मंत्र कर्म वा भक्ती न जाणे काल्पनिक पूजा।
सद्भावाने केली उद्धरी निस्सीम भक्त तुझा।।

गण गण गणांत बोते भजनी दंग सदा तुम्ही।
सिद्ध मंत्र हा जपूनी सर्वदा पावन हो आम्ही।
एक मागणे शिरी असावा वरदहस्त तुझा।
गजानना ही आस पुरवी घ्या नमस्कार माझा।।

मानसपूजा श्लोक त्रिकाली एकवीस आवर्तने।
उच्चारूनी संकल्प आपुला करी जो श्रध्देने।
मिटतील चिंता हरतिल व्याधी टळतील आपत्ती।
गजाननाच्या कृपाप्रसादे सहज मोक्ष प्राप्ती।।

**अनंतकोटी ब्रह्माण्डनायक महाराजाधिराज योगिराज**
**परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी**
**समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय।।**

✻ ✻ ✻

## ✻ नामजप ✻

**३ मिनिटे श्री स्वामी समर्थ नामजप**

॥ श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ
सद्‌गुरु स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ
महाराज श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ
सद्‌गुरू स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ ॥

**३ मिनिटे श्री साई बाबा नामजप**

॥ ॐ साई नमो नमः श्री साई नमो नमः
जय जय साई नमो नमः सद्‌गुरू साई नमो नमः ॥

**३० मिनिटे श्री गजानन महाराज नामजप**

॥ गण गण गणांत बोते ॥

**अनंतकोटी ब्रह्माण्डनायक महाराजाधिराज योगिराज
परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी
समर्थ सद्‌गुरु श्री गजानन महाराज की जय॥**

✻ ✻ ✻

# ✻ श्री गजानन महाराजांचे २१ नमस्कार ✻

## (दुर्वांकुर)

शेगांव ग्रामी वसले गजानन। स्मरणे तयांच्या हरतील विघ्न।।
म्हणुनी स्मरा अंतरी सद्गुरुला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।१।।

येऊनी तेथे अकस्मात मूर्ति। करी भाविकांच्या मनाचीच पूर्ति।।
उच्छिष्ट पात्राप्रती सेवियेला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।२।।

उन्हा तहानेची नसे त्यास खंत। दावियले सत्य असेचि संत।।
पाहुनी त्या चकित बंकटलाल झाला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।३।।

घेऊनी गेला आपुल्या गृहासी। मनोभावे तो करी पूजनासी।।
कृपाप्रसादे बहु लाभ झाला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।४।।

मरणोन्मुखी तो असे जानराव। तयांच्या मुळे लाभला त्यास जीव।।
पदतीर्थ घेता पुनर्जन्म झाला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।५।।

पहा शुष्कवापी भरली जलाने। चिलिम पेटविली तये अग्निविणे।।
चिंचवणे नाशिले करी अमृताला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।६।।

ब्रह्म गिरिला असे गर्व मोठा। करि तो प्रचारा अर्थ लावूनि खोटा।।
क्षणाधार्त त्याचा परिहार केला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।७।।

बागेतली जाती खाण्यास कणसं। धुरामुळे करिती मक्षिका त्यास दंश।।
योगबळे काढिले कंटकाला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।८।।

भक्ताप्रती प्रीत असे अपार। धावुनी जाती तया देती धीर।।
पुंडलिकाचा ज्वर तो निमाला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।९।।

बुडताच नौका नर्मदेच्या जलात। धावा करिती तुमचाचि भक्त।।
स्त्री वेष घेऊनी तिने धीर दिला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।१०।।

संसार त्यागियला बायजाने। गजानना सन्निध वाही जिणे।।
सदा स्मरे ती गुरूच्या पदाला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।११।।

पितांबरा करी भरी उदकात तुंबा। पाणी नसे भरविण्या नाल्यास तुंबा।।
गुरूकृपेने तो तुंबा बुडाला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।१२।।

हरितपर्ण फुटले शुष्क आम्रवृक्षा। पितांबराची घेत गुरू परीक्षा।।
गुरूकृपा लाभली पितांबराला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।१३।।

चिलीम पाजावी म्हणून श्रीसी। इच्छा मनी जाहली भिक्षुकासी।।
हेतू तयाचा अंतरी जाणियेला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।१४।।

बाळकृष्णा घरी त्या बाळापुरासी। समर्थरूपे दिले दर्शनासी।।
सज्जनगडाहूनी धावुनी आला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।१५।।

नैवेद्य पक्वान्न बहु आणियेले। कांदा भाकरीसी तुम्ही प्रिय केले।।
कंवरासी पाहुनी आनंद झाला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।१६।।

गाडी तुम्ही थांबविली दयाळा। गार्डाप्रति दावियेली हो लीला।।
शरणांगती घेऊनी तोही आला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।१७।।

जाति धर्म नाही तुम्ही पाळियेला। फकीरा सवे हो तुम्ही जेवियेला।।
दावूनी ऐसे जना बोध केला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।१८।।

अग्रवालास सांगे म्हणे राममूर्ति। अकोल्यास स्थापुनी करी दिव्यकीर्ति।।
सांगता क्षणी तो पहा मानियेला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।१९।।

करंजपुरीचा असे विप्र एक। उदरी तयाच्या असे हो कि दुःख।।
दुःखातुनी तो पहा मुक्त झाला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।२०।।

दुर्वांकुरा वाहुनी एकवीस। नमस्काररूपी श्रीगजानानास।।
सख्यादास वाही श्रीगुरूच्या पदाला। नमस्कार माझा श्रीगजाननाला ।।२१।।

**अनंतकोटी ब्रह्माण्डनायक महाराजाधिराज योगिराज**
**परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी**
**समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय।।**

* * *

# ✲ श्री गजानन महाराज अष्टक ✲

गजानना गुणागरा परम मंगला पावना। अशीव अवघें हरी, दुरित तेंवि दुर्वासना।।
नसे त्रिभुवनामधे तुजविणे आम्हा आसरा। करी पदनतावरी बहु दया, न रोषा धरा ।।१।।

निरालसपणे नसे घडलि अल्प सेवा करी। तुझी पतितपावना भटकलों वृथा भूवरी।।
विसंबत न गाय ती आपुलिया कधीं वासरा। करी पदनतावरी बहु दया, न रोषा धरा ।।२।।

अलास जगी लावण्या परतुनी सु-वाटे जन। समर्थ गुरूराज ज्या भुषवी नाम नारायण।।
म्हणून तुज प्रार्थना सतत जोडूनिया करा। करी पदनतावरी बहु दया, न रोषा धरा ।।३।।

क्षणांत जल आणिलें नसून थेंब त्या वापिला। क्षणांत गमनाप्रती करिसी इच्छिलेल्या स्थला।।
क्षणांत स्वरूपे किती विविध धारिसी धीवरा। करी पदनतावरी बहु दया, न रोषा धरा ।।४।।

अगाध करणी तुझी गुरूवरा न लोकां कळे। तुला त्यजुनी व्यर्थ ते अचरितात नाना खुळे।।
कृपा उदक मागती त्यजुनी गौतमीच्या तिरा। करी पदनतावरी बहु दया, न रोषा धरा ।।५।।

समर्थस्वरूपाप्रती धरूनी साच बाळापुरी। तुम्ही प्रकट जाहलां सुशिल बाळकृष्णा घरीं।।
हरिस्वरूप घेऊनी दिधली भेट भीमातिरा। करी पदनतावरी बहु दया, न रोषा धरा ।।६।।

सच्छिद्र नौकेप्रती त्वदियं पाय हे लागतां । जलात बुडता तरी तिजसि नर्मदा दे हाता।।
अशा तुजसि वाणण्या नच समर्थ माझी गिरा। करी पदनतावरी बहु दया, न रोषा धरा ।।७।।

अतां न बहु बोलतां तव पदांबुजा वंदितों। पडो विसर न कदा मदिय हेंचि मी मागतों।।
तुम्ही वरद आपुला कर धरा गणूच्या शिरा। करी पदनतावरी बहु दया, न रोषा धरा ।।८।।

**अनंतकोटी ब्रह्माण्डनायक महाराजाधिराज योगिराज**

**परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी**

**समर्थ सद्‌गुरू श्री गजानन महाराज की जय।।**

✲ ✲ ✲

## ✻ श्री गजानन महाराज भजन ✻

शेगावीच्या राण्याला डोळे भरून पाहतो।
आम्ही गजाननाच्या भजनात नाहतो ।।धृ।।
दत्तरूपी गजानन, सत्यरूपी गजानन।
देवरूपी गजानन, तुम्हा आम्हां पावो।
आम्ही गजाननाच्या भजनात नाहतो ।।१।।
प्रेमरूपी गजानन, देहरूपी गजानन।
सखारूपी गजानन, तुम्हा आम्हां लाभो।
आम्ही गजाननाच्या भजनात नाहतो ।।२।।
साईरूपी गजानन, सूर्यरूपी गजानन।
आत्मारूपी गजानन, अंतरंगी राहो।
आम्ही गजाननाच्या भजनात नाहतो ।।३।।
मातृरूपी गजानन, पितृरूपी गजानन।
गुरूरूपी गजानन, आम्हां सुख देवो।
आम्ही गजाननाच्या भजनात नाहतो ।।४।।

**अनंतकोटी ब्रह्माण्डनायक महाराजाधिराज योगिराज**
**परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी**
**समर्थ सद्‌गुरु श्री गजानन महाराज की जय।।**

✻ ✻ ✻

# ✻ श्री गजानन महाराज अभंग ✻

‘‘गण गण गणांत बोते’’। हे भजन प्रिय सद्गुरुतें।

या श्रेष्ठ गजानन गुरूतें। तुम्ही आठवित रहा यातें।

हे स्तोत्र नसे अमृत तें। मंत्राचि योग्यता यातें।

हे संजीवनी आहे नुसते। व्यावहारिक अर्थ न याते।

मंत्राची योग्यता कळते। जो खराच मांत्रिक त्याते।

या पाठे दुःख ते हरतें। पाठका अती सुख होतें।

हा खचित अनुग्रह केला। श्री गजाननें तुम्हांला।

घ्या साधुन अवघे याला। मनी धरून भावभक्तिला।

कल्याण निरंतर होई। दुःख ते मुळी नच राही।

असल्यास रोग तो जाई। वासना सर्व पुरतिलही।

आहे याचा अनुभव आला। म्हणूनियां कथित तुम्हांला।

तुम्ही बसून क्षेत्र शेगांवी। स्तोत्राची प्रचिती पहावी।

ही दंतकथा ना लवही। या गजाननाची ग्वाही।।

**अनंतकोटी ब्रह्माण्डनायक महाराजाधिराज योगिराज**

**परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी**

**समर्थ सदगुरू श्री गजानन महाराज की जय।।**

✻ ✻ ✻

जय जय सद्गुरु गजानना। रक्षक तूची भक्तजना ।।१।।

निर्गुण तू परमात्मा तू। सगुण रूपात गजानन तू ।।२।।

सदेह तू परि विदेह तू। देह असुनि देहातीत तू ।।३।।

माघ वद्य सप्तमी दिनी। शेगावात प्रगटोनी ।।४।।

उष्ट्या पत्रावळी निमित्त। विदेहत्व तव हो प्रगट ।।५।।

बंकटलालावरी तुझी। कृपा जाहली ती साची ।।६।।

गोसाव्याच्या नवसासाठी। गांजा घेसी लावुनी ओठी ।।७।।

तव पदतीर्थे वाचविला। जानराव तो भक्त भला ।।८।।

जानकीरामा चिंचवणे। नासवुनी स्वरूपी आणणे ।।९।।

मुकिन चंदुचे कानवले। खाऊनि कृतार्थ त्या केले ।।१०।।

विहिरीमाजी जलविहीना। केले देवा जलभरणा ।।११।।

मधमाश्यांचे डंख तुवा। सहन सुखे केले देवा ।।१२।।

त्यांचे काटे योगबले। काढुनी सहजी दाखविले ।।१३।।

कुस्ती हरिशी खेळोनी। शक्ती दर्शन घडवोनी ।।१४।।

वेद म्हणूनी दाखविला। चकित द्रविड ब्राह्मण झाला ।।१५।।

जळत्या पर्यकावरती। ब्रह्मगिरीला ये प्रचिती ।।१६।।

टाकळीकर हरिदासाचा। अश्व शांत केला साचा ।।१७।।

बाळकृष्ण बाळापूरचा। समर्थ भक्तचि जो होता ।।१८।।

रामदासरूपे त्याला। दर्शन देवुनि तोषविला ।।१९।।

सुकलालाची गोमाता। द्वाड बहू होती ताता ।।२०।।

कृपा तुझी होताचं क्षणी। शांत जाहली ती जननी ।।२१।।

घुडे लक्ष्मण शेगावी। येत व्याधी तू निरवी ।।२२।।

दांभिकता परि ती त्याची। तू न चालवुनि घे साची ।।२३।।

भास्कर पाटील तव भक्त। उद्धरिलासी तू त्वरित ।।२४।।

आज्ञा तव शिरसा वंद्य। काकहि मानति तुज वंद्य ।।२५।।

विहिरीमाजी रक्षियला। देवा तू गणू जवऱ्याला ।।२६।।

पिंताबराकरवी लीला। वठला आंबा पल्लविला ।।२७।।

सुबुद्धी देशी जोश्याला। माफ करी तो दंडाला ।।२८।।

सवडद येथील गंगाभारती। थुंकुनि वारिली रक्तपिती ।।२९।।

पुंडलिकाचे गंडांतर। निष्ठा जाणूनि केले दूर ।।३०।।

ओंकारेश्वरी फुटली नौका। तारी नर्मदा क्षणांत एका ।।३१।।

माधवनाथा समवेत। केले भोजन अदृष्य ।।३२।।

लोकमान्य त्या टिळकांना। प्रसाद तूची पाठविला ।।३३।।

कवर सुताची कांदा भाकर। भक्षिलीस त्वा प्रेमाखातर ।।३४।।

नग्न बैसुनी गाडीत। लीला दाविली विपरीत ।।३५।।

बायजे चित्ती तव भक्ती। पुंडलिकावर विरक्त प्रीती ।।३६।।

बापुना मनी विठ्ठल भक्ती। स्वये होशि तू विठ्ठल मूर्ती ।।३७।।

कवठ्याच्या त्या वारकऱ्याला। मरीपासूनी वाचवीला ।।३८।।

वासुदेव यति तुज भेटे। प्रेमाची ती खूण पटे ।।३९।।

उद्धट झाला हवालदार। भस्मिभूत झाले घरदार ।।४०।।

देहांताच्या नंतरही। कितीजणा अनुभव येई ।।४१।।

पडत्या मजुरा झेलियेले। बघती जन आश्चर्य भले ।।४२।।

अंगावरती खांब पडे। स्त्री वांचे आश्यर्च घडे ।।४३।।

गजाननाच्या अद्भुत लीला। अनुभव येती आज मितीला ।।४४।।

शरण जाऊनी गजानना। दुःख तयाते करि कथना ।।४५।।

कृपा करी तो भक्तांसी। धावुनी येतो वेगेसी ।।४६।।

गजाननाची बावन्नी। नित्य असावी ध्यानीमनी ।।४७।।

बावन्न गुरूवारी नेमे। करा पाठ बहु भक्तीने ।।४८।।

विघ्ने सारी पळती दूर। सर्व सुखाचा येई पूर ।।४९।।

चिंता साऱ्या दूर करी। संकटातुनी पार करी ।।५०।।

सदाचार रत सद्भक्ता। फळ लाभे बघता बघता ।।५१।।

सुरेश बोले जय बोला। गजाननाची जय बोला ।।५२।।

जय बोला हो जय बोला। गजाननाची जय बोला ।।

**अनंतकोटी ब्रह्माण्डनायक महाराजाधिराज योगिराज**

**परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी**

**समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय।।**

* * *

## ❊ श्री गजानन चालीसा ❊

अदभुत कृतियाँ प्रकृति ग्रंथ में, अगणित वर्णित हैं जिनकी।
कतिपय कृतियाँ चालीसा में, वर्णन करता मैं उनकी ।।१।।

प्रभो गजानन शरण आपकी, अटुट सेवा भक्ति मिले।
सौंप दिया यह जीवन सारा, चरण शरण तब शक्ति मिले ।।२।।

माघ महीना कृष्ण सप्तमी, शके अठराह सौ ही था।
तारीख तेवीस  फ़रवरी महीना, वर्ष अठारह अठोत्तर था ।।३।।

प्रगटे थे शेगाव गांव में, अन्त काल तक वहीं रहे।
इसके पहले काशी में थे, दीक्षित सन्यासी रहे ।।४।।

प्रथम बताया अन्न ब्रह्म है, पानी ईश्वर कहाँ नहीं।
गणिगण कहते करवाते थे, राम भजन भी कहीं-कहीं ।।५।।

महा भागवत सुना सन्त मुख, तुम्बे जल ने चकराया।
जानराव जब मरण तोल थे, चरण तीर्थ से बच पाया ।।६।।

चिलम जली जब बिना आग से, सुना अलौकिक गुण भारी।
जन समूह तो अपार उमड़ा, दर्शन लेने सुखकारी ।।७।।

इन्कार किया जब सुनार ने, उसने वैसा फल पाया।
कान्होला की करी मांग जब, माह पुराना भी आया ।।८।।

मन्त्र उजागर हेतु अचानक, विप्र वेद पाठी आये।
यह भी गुरू की महिमा ही थी, मानो स्वयं बुला लाये ।।९।।

उठ बैठा जब मरा श्वान भी, शुष्क कूप में जल आया।
आया जल भी अथाह उसमें, जन समूह बहु चकराया ।।१०।।

भाग गया सारा जन समूह, स्वामीजी तो रहे अड़े।
टूट पड़ी मधुमक्खियाँ, काँटे श्वास रोक से निकल पडे ।।११।।

महापुरूष नरसिंह देव को, ईश तत्व का ज्ञान दिया।
कर्म भक्ति अरूयोग पंथ से, मिलते प्रभु हैं समझ लिया ।।१२।।

गर्व न आवे निज-निज पथ में, अवश्य सिद्धि उसे मिलती।
कमल पत्र सम जग में रहते, शान्ति सन्त को तब मिलती ।।१३।।

भास्कर खंडू बडे भक्त थे, सेवा स्वामी की करते।
अन्य बन्धु तो हंसी उड़ाते, हारे पर सत्पथ धरते ।।१४।।

खंडूजी को पुत्र नहीं था, गुरू प्रसाद से पुत्र हुआ।
जेल कष्ट था खंडूजी को, गुरू कृपा से कुछ न हुआ ।।१५।।

स्वामीजी के मुख से निकली, वेद ऋचाएँ घबराये।
भुसुर भागे ऐसे भागे, निज गलती पर पछताये ।।१६।।

गुरूजी क्या रामदास भी, बालकृष्ण को चकराया।
बाद दिखाकर निज स्वरूप भी, समझ इसे भक्तन पाया ।।१७।।

रामदास का श्लोक श्रवण कर, गुरू गजानन के मुख से।
कभी गजानन रामदास के, रूप दिखाये अन्तर से ।।१८।।

पुनः स्वप्न में समर्थ आये, मेरा रूप गजानन हैं।
कभी न लाना मन में संशय, समर्थ रूप गजानन हैं ।।१९।।

बालापुर में एक गाय थी, सबको थी वह दुःख देती।
किसी तरह गुरुजी तक लाये, सबको छूने अब देती ।।२०।।

इस आश्रम में रही हमेशा, सन्तति उसकी अब भी है।
कृत्य अलौकिक योगीजी के, अमर सर्वदा अब भी है ।।२१।।

पंडितजीके घोड़े की भी, छुडा दुष्टता भी दी थी।
गुरुशरण में पंडित आये, चरणवन्दना अति की थी ।।२२।।

गुरुकृपा ने भास्करजी को प्राण छूटते मोक्ष दिया।
अन्नदान भी स्वयं गुरु ने, भूखों को भरपेट दिया ।।२३।।

याद किया जब गणू भक्त ने रक्षा कर उपदेश दिया।
बच्चू गुरु को वस्त्राभूषण देते गुरु ने नहीं लिया ।।२४।।

छोड़ गये सब वस्त्राभूषण हमको इससे लाभ नहीं।
हम तो केवल भक्ति चाहते धनदौलत का काम नहीं ।।२५।।

बंडूतात्या विप्रनाम का कर्जभार से घबराया।
आत्महत्या करना सोंचा गुरु ने तब धन बतलाया ।।२६।।

उसी द्रव्य से कर्ज मुक्त हो गुरु से सच्चा ज्ञान लिया।
अनेक लीला बंकट के घर करके सच्चा ज्ञान दिया ।।२७।।

बीच नर्मदा नाव गई जब बड़े छेद से जल आया।
मातु नर्मदा इन्हे देख कर स्वयं दिखाई निज माया ।।२८।।

सबको धीरज दिया सन्त ने और कहा रेबा चतुराई।
जहां सन्त हैं वहां पुण्य हैं, पुण्य न होता दुखदाई ।।२९।।

रोटी त्रिम्बक भाऊ भक्त की, बडे प्रेम से खाई थी।
इस भोजन की करी प्रतिक्षा गुरुजी को जो भाई थी ।।३०।।

तुकाराम के सिर में छर्रा, उसको बेहद पीडा थी।
गुरु कृपा से गिरा कानसे हटी पुरानी पीडा थी ।।३१।।

सुना गया है रेल भ्रमण में हठ योगी थे कहलाये।
तिलक सभा में सभापति थे राज योगि भी कहलाये ।।३२।।

आम्र पेड़ पर गुरुजी ने तो, बिना रितू फल बतलाया।
गुरुकृपा से पीताम्बर ने, वृक्ष हरा कर दिखलाया ।।३३।।

कोंडोली में यही वृक्ष भी, आज अधिक फल देता है।
कुछ न असम्भव गुरु कृपा से आशिष गुरु की लेता है ।।३४।।

पहुँचे जीवन मुक्त स्थिति में शरीर का कुछ भान नहीं।
चरित्र उनके बडे अलौकिक भोजन का भी ध्यान नहीं ।।३५।।

भादव महिना शुक्ल पंचमी, शके अठराह बत्तीस था।
गुरुवार था देह त्याग का, सन भी उन्नीस सौ दस था ।।३६।।

अस्तित्व हमारा यही रहेगा, भले देह से छुटकारा।
समाधि अन्दर देह रहेगा, बाहर आतम उजियारा ।।३७।।

योगी ही थे गुरु गजानन, अब भी वे दर्शन देते।
समाधि का जो दर्शन करते, उनकी अब भी सुधि लेते ।।३८।।

बनी हुई शेगांव गांव में, समाधि जो सब ताप हरे।
दर्शन करने जो भी जाते, उन सबके दुःख हरण करे ।।३९।।

जगह-जगह पर गुरु गजानन, मन्दिर बनते जाते हैं।
नित्य नियम जो दर्शन करते, सातों सुख वे पाते हैं ।।४०।।

कृत्य अलौकिक योगी जी के नत मस्तक स्वीकार करो।
शीश झुका है गुरु चरणों में, मम प्रणाम स्वीकार करो ।।४१।।

## * दोहा *

श्रवण करे या नित पढे गुरू की महिमा कोय।
उसकी पूरण कामना, जो भी मन में होय।।

**अनंतकोटी ब्रह्माण्डनायक महाराजाधिराज योगिराज**
**परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी**
**समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय।।**

* * *

# ✻ अष्टोत्तरशत नामावली ✻

ॐ अक्षय सुखाय नम:
ॐ अखिलेशाय नम:
ॐ अभयाय नम:
ॐ अनंताय नम:
ॐ अत्रिपुत्राय नम:
ॐ अविनाशिनेन नम:
ॐ अग्न्युत्पत्तिकराय नम:
ॐ अथर्ववेदाय नम:
ॐ आत्मैक्याय नम:
ॐ अद्वैताय नम:
ॐ उपधिरहिताय नम:
ॐ ऐं वाक्प्रदाय नम:
ॐ ओंकारेश्वराय नम:
ॐ ऋषये नम:
ॐ ऋणमोचनाय नम:
ॐ कर्पूरगौराय नम:
ॐ क्लीं कृष्णाय नम:
ॐ केशवाय नम:
ॐ खं ब्रह्माय नम:
ॐ गणाध्यक्षाय नम:
ॐ गुणतीताय नम:
ॐ घृष्णेश्वराय नम:
ॐ चैतन्याय नम:
ॐ जगन्नाथाय नम:
ॐ जगद्धीताय नम:
ॐ जीवन्मुक्ताय नम:
ॐ तिमिरनाशकाय नम:
ॐ तुर्यातीताय नम:

ॐ अयोनिसंभवाय नम:
ॐ अच्युताय नम:
ॐ अभेदाय नम:
ॐ अभ्युदयाय नम:
ॐ अखंडाय नम:
ॐ अमरत्वाय नम:
ॐ अग्निशमनाय नम:
ॐ अधर्मनाशकाय नम:
ॐ आशुतोषाय नम:
ॐ उष्णशीतपर्जन्याय नम:
ॐ एकदंताय नम:
ॐ ऐश्वर्याय नम:
ॐ औदुंबरकल्पवृक्षाय नम:
ॐ ऋग्वेदाय नम:
ॐ कालिमलदहनाय नम:
ॐ कालान्तकाय नम:
ॐ कृतज्ञाय नम:
ॐ कैवल्यधामाय नम:
ॐ गं गणपतये नम:
ॐ गजाननाय नम:
ॐ गोविंदाय नम:
ॐ चिरंजीविने नम:
ॐ जगद्धीशाय नम:
ॐ जनार्दनाय नम:
ॐ जितेंद्रियाय नम:
ॐ तेजोमयाय नम:
ॐ तत्पुरुषाय नम:
ॐ दयानिधये नम:

ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः
ॐ दिगंबराय नमः
ॐ देवाधिदेवाय नमः
ॐ नग्नाऽवधूताय नमः
ॐ निर्विकाराय नमः
ॐ नित्यशुद्धाय नमः
ॐ पतितोद्धारकाय नमः
ॐ पुण्यपुरुषाय नमः
ॐ परमहंसाय नमः
ॐ परोक्षाय नमः
ॐ प्रसन्नवदनाय नमः
ॐ पापविमोचनाय नमः
ॐ ब्रह्मरुपाय नमः
ॐ भक्ततारकाय नमः
ॐ भागवतधर्माय नमः
ॐ महादेवाय नमः
ॐ महासिद्धाय नमः
ॐ योगेश्वराय नमः
ॐ रामदासाय नमः
ॐ विष्णवे नमः
ॐ शिवस्वरुपाय नमः
ॐ स्मृर्तृगामिने नमः
ॐ सर्वयंत्रमंत्रतंत्रस्वरुपाय नमः
ॐ सर्वज्ञाय नमः
ॐ सामवेदाय नमः
ॐ हरिहाराय नमः

ॐ दिव्याय नमः
ॐ दु:खभंजनाय नमः
ॐ धर्मरक्षकाय नमः
ॐ नारायणाय नमः
ॐ निरंजनाय नमः
ॐ पुरुषोत्तमाय नमः
ॐ परमात्मने नमः
ॐ परब्रह्मस्वरुपिणे नमः
ॐ प्रत्यक्षाय नमः
ॐ परात्पराय नमः
ॐ परेशाय नमः
ॐ ब्रह्मांडनायकाय नमः
ॐ भक्तवत्सलाय नमः
ॐ भजनप्रियाय नमः
ॐ भूमंडलाचार्य नमः
ॐ मृत्युंजयाय नमः
ॐ यजुर्वेदाय नमः
ॐ रां रामाय नमः
ॐ लंबोदराय नमः
ॐ विश्वदेवाय नमः
ॐ शेगांवनिवासिने नमः
ॐ स्मरणमात्रसंतुष्टाय नमः
ॐ सर्वसंपुष्टपल्लवस्वरुपाय नमः
ॐ सच्चिदानंदाय नमः
ॐ गुदेवाय नमः
ॐ ज्ञानेशाय नमः

इति श्री विश्वनाथ अवधूत – विरचित अष्टोत्तरशत नामावली संपूर्णः
अनंतकोटी ब्रह्माण्डनायक महाराजाधिराज योगिराज परब्रह्म सच्चिदानंद
भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय।।
विजयतेतराम् । विजयतेतराम् । विजयतेतराम्
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।

* * *

# ✻ श्रीराम वंदना ✻

नादातुनी या नाद निर्मितो । श्रीराम जय राम जय जय राम ।।
नादातुनी या नाद निर्मितो । श्रीराम जय राम जय जय राम ।।
नाद निर्मितो मंगलधाम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
परब्रह्मात आहे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
चैतन्यात आहे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
सत्संगाचा सुगंध राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
आनंदाचा आनंद राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
त्रिभुवनतारक आहे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
सुखकारक हा आहे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
श्रद्धा जेथे तेथे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
शांती जेथे तेथे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
सबुरी ठायी आहे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
चैतन्याचे सुंदर धाम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
पुरुषोत्तम परमेश राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
भक्ति भाव तेथे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
सगुण सुंदर आहे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
निर्गुणी सुंदर आहे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
लावण्याचा गाभा राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
कैवल्याची मूर्ती राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
चराचरातील स्फूर्ती राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
आत्म्याठायी आहे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
परमात्मा ही आहे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
सगुणातही आहे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
निर्गुणी सुंदर आहे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
जे जे मंगल तेथे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
सुमंगलाची पहाट राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
सृष्टीचे ह्या चलन राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
कर्तव्याचे पालन राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
दुःख निवारक आहे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।

स्वानंदाच्या ठायी राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
सुंदर सूर तेथे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
शब्द सुंदर तेथे राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
सकल जीवांच्या ठायी राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
वात्सल्याचे स्वरूप राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
सुंदर माधव मेघ श्याम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
दशरथ नंदन रघुवीर राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
अयोध्यापती योद्धा राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
रघुपती राघव राजाराम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
रामनाम सुखदायक राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
सकल सुखाचा सागर राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
चराचरातील जागर राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
रामभक्त नीत स्मरतो राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
कुशलव गायनी रमतो राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
हनुमंताच्या ह्रदयी राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
जानकी वल्लभ राजस राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
चराचरातील आत्मा राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
समर्थ वचनी रमला राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
कुलभूषण रघुनंदन राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
राम गायनी रमतो राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
स्वरांकुरांच्या ह्रदयी राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
भक्तीरंगी खुलतो राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
दाशरथी हा निजसुखधाम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
कौसल्यासुत ह्रदयनिवास । श्रीराम जय राम जय जय राम ।।
राजीवलोचन पुण्यनिध्य हा । श्रीराम जय राम जय जय राम ।।
सीतापती कैवल्य प्रमाण । श्रीराम जय राम जय जय राम ।।
पत्नीपरायण सीताराम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
लक्ष्मण छाया दे विश्राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
आदर्शांचा आदर्श राम । श्रीराम जय राम जय जय राम ।।
एक वचनी हा देव महान । श्रीराम जय राम जय जय राम ।।

* * *

## ✻ महाराजांचे आवडते भजन ✻

भोलानाथ हे दिगंबर, दु:ख मेरा हरो रे ।

चंदन, चावल, बेल की पतीया, शिवजीके माथे धरो रे ॥धृ॥

अगर चंदन का भस्म चढाऊ ते, शिवजीके पैय्या पडोरे ॥१॥

नंदी जो उपर स्वार भये रामा, मस्तकी गंगा धरो रे ॥२॥

शिवशंकर को तीन नेत्र है, अद्‌भुत रुप धरो रे ॥३॥

अर्धांग गौरी पुत्र गजानन, चंद्रमा माथे धरो रे ॥४॥

आसन डाल सिंहासन बैठे, शांति समाधी धरो रे ॥५॥

कांचन थाली कपूर की बाती, शिवजी की आरती करो रे ॥६॥

मिरा के प्रभु गिरीधर नागर, चरणो मे शिश धरो रे ॥७॥

✻ ✻ ✻

# आरती संग्रह

# ✻ अनुक्रमणिका ✻


- श्री गणपतीची आरती २७
- श्री दुर्गा देवी आरती २८
- श्री महालक्ष्मीची आरती २९
- श्री शंकराची आरती ३०
- श्री दत्ताची आरती ३१
- श्री पांडुरंगाची आरती ३२
- श्री विठ्ठलाची आरती ३३
- श्री रामचंद्राची आरती ३४
- श्री मारुतीची आरती ३५
- श्री साईबाबांची आरती ३६
- श्री नवरात्री देवीची आरती ३७
- श्री रेणुका माता आरती ३९
- श्री गजानन महाराजांची आरती ४०
- कर्पूरारती, घालीन लोटांगण ४१
- मंत्रपुष्पांजली, गायत्री मंत्र ४२

# ✻ श्री गणपतीची आरती ✻

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची।

नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची।

सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची।

कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ।।१।।

जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती।

दर्शनमात्रें मनकामना पुरती ।।धृ।।

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा।

चंदनाची उटी कुंकुम केशरा।

हिरेजडित मुकुट शोभतो बरा।

रूणझुणती नूपुरें चरणी घागरिया ।।२।।

लंबोदर पितांबर फणिवरवंदना।

सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना।

दास रामाचा वाट पाहे सदना।

संकटीं पावावें निर्वाणीं रक्षावे सुरवरवंदना ।।३।।

✻ ✻ ✻

# ✻ श्री दुर्गा देवी आरती ✻

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी।
अनाथनाथें अंबे करुणा विस्तारीं।
वारीं वारीं जन्ममरणातें वारीं।
हारीं पडलों आतां संकट निवारीं ।।१।।
जय देवी जय देवी जय महिषासुरमथिनी।
सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ।।धृ।।

त्रिभुवनभुवनीं पाहता तुज ऐसे नाही।
चारी श्रमले परंतु न बोलवें कांहीं।
साही विवाद करिंता पडले प्रवाही।
ते तूं भक्तांलागीं पावसी लवलाही ।।२।।

प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासा।
क्लेशापासुनि सोडवी तोडीं भवपाशा।
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा।
नरहरी तल्लीन झाला पदपंकजलेशा ।।३।।

✻ ✻ ✻

# ✻ श्री महालक्ष्मीची आरती ✻

जय देवी जय देवी जय महालक्ष्मी।
वससी व्यापकरूपें तूं स्थूलसूक्ष्मी ।।धृ।।
करविरपुरवासिनी सुरवरमुनिमाता।
पुरहरवरदायिनी मुरहरप्रियकांता।
कमलाकारें जठरीं जन्मविला धाता।
सहस्रवदनीं भूधर नपुरे गुण गाती ।।१।।
मातुलिंग गदायुत खेटक रविकिरणी।
झळके हाटक-वाटी पीयुषरसपाणी।
माणिकरसना सुरंगवसना मृगनयनी।
शशिधरवदना राजस मदनाची जननी ।।२।।
तारा शक्ति अगम्या शिवभजकां गोरी।
सांख्य म्हणती प्रकृति निर्गुण निर्धारी।
गायत्री निजबाजा निगमागम सारी।
प्रकटे पद्मावत्ती निजधर्माचारी ।।३।।
अमृतभरिते सरिते अघदुरितें वारी।
मारी दुर्घट असुरां भव दुस्तर तारी।
वारी मायापटल प्रणमत परिवारी।
हे रूप चिद्रुप दावी निर्धारी ।।४।।
चतुराननें कुश्चित कर्माच्या ओळी।
लिहिल्या असतील माते माझे निजभाळी।
पुसोनी चरणातळी पदसुमने क्षाळी।
मुक्तेश्वर नागर क्षीरसागरबाळी ।।५।।

✻ ✻ ✻

## ✻ श्री शंकराची आरती ✻

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा।

विषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा।

लावण्यसुंदर मस्तकीं बाळा।

तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ।।१।।

जय देव जय देव जय श्रीशंकरा।

आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा ।।धृ।।

कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा।

अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा।

विभूतिचे उधळण शितिकंठ नीळा।

ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।।२।।

देंवी दैत्यीं सागरमंथन पैं केलें।

त्यामाजीं अवचित हलहल ते उठिलें।

तें त्वां असुरपणें प्राशन केलें।

नीळकंठ नाम प्रसिद्ध झालें ।।३।।

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी।

पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी।

शतकोटींचें बीज वाचे उच्चारी।

रघुकुळटिळक रामदासा अंतरीं ।।४।।

✻ ✻ ✻

# ✻ श्री दत्ताची आरती ✻

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा।

त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा।

नेति नेति शब्द न ये अनुमाना।

सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ।।१।।

जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता।

आरती ओवाळितां हरली भवचिंता ।।धृ।।

सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त।

अभाग्यासी कैंची कळेल ही मात।

पराही परतली तेथें कैंचा हा हेत।

जन्ममरणाचा पुरलासे अंत ।।२।।

दत्त येऊनियां ऊभा ठाकला।

सद्भावे साष्टांगें प्रणिपात केला।

प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला।

जन्ममरणाचा फेरा चुकविला ।।३।।

दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान।

हारपलें मन झालें उन्मन।

मी तूं पणाची झाली बोळवण।

एका जनार्दनीं श्रीदत्तध्यान ।।४।।

✻ ✻ ✻

## ※ श्री पांडुरंगाची आरती ※

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा।
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा।
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा।
चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ।।१।।
जय देव जय देव जय पांडुरंगा।
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा ।।धृ।।
तुळसीमाळा गळा कर ठेऊनी कटी।
कासे पीतांबर कस्तुरी लल्लाटी।
देव सुरवर नित्य येती भेटी।
गरुड हनुमंत पुढे उभे राहती ।।२।।
धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा।
सुवर्णाची कमळे वनमाळा गळा।
राही रखुमाई राणीया सकळा।
ओवाळीती राजा विठोबा सावळा ।।३।।
ओवाळू आरत्या कुर्वंड्या येती।
चंद्रभागेमध्ये सोडुनिया देती।
दिंड्या पताका वैष्णव नाचती।
पंढरीचा महिमा वर्णावा किती ।।४।।
आषाढी कार्तिकी भक्तजन येती।
चंद्रभागेमध्ये स्नाने जे करिती।
दर्शन हेळामात्रे तया होय मुक्ती।
केशवासी नामदेव भावे ओवाळीती ।।५।।

* * *

# ✻ श्री विठ्ठलाची आरती ✻

येई हो विठ्ठले माझे माऊली ये।

निढळावरी कर ठेवूनी वाट मी पाहे ।।धृ।।

आलिया गेलिया हाती धाडी निरोप।

पंढरपुरी आहे माझा मायबाप ।।१।।

पिवळा पितांबर कैसा गगनी झळकला।

गरुडावरी बैसोनि माझा कैवारी आला ।।२।।

विठोबाचे राज्य आम्हां नित्य दिपावळी।

विष्णुदास नामा जीवे भावें ओवाळी ।।३।।

✻ ✻ ✻

## ✻ श्री रामचंद्राची आरती ✻

उत्कट साधुनि शिळा सेतु बांधोनी।
लिंगदेह लंकापुर विध्वंसुनी।
कामक्रोधादिक राक्षस मर्दूनी।
देह-अहंभाव रावण निवटोनी ।।१।।
जय देव जय देव जय निजबोधा रामा।
परमार्थे आरती, सद्भावें आरती परिपूर्णकामा ।।धृ।।
प्रथम सीताशुद्धी हनुमंत गेला।
लंका दहन करुनी अखया मारिला।
मारिला जंबूमाळी भुवनी त्राहाटीला।
आनंदाची गूढी घेऊनियां आला ।।२।।
निजबळे निजशक्ती सोडविली सीता।
म्हणुनी येणें झालें अयोध्ये रघुनाथा।
आनंदे वोसंडे वैराग्य भरता।
आरती घेऊनि आली कौसल्या माता ।।३।।
अनाहतध्वनी गर्जति अपार।
अठरा पद्में वानर करिती भुभुःकार।
अयोध्येसी आले दशरथकुमार।
नगरी होत आहे आनंद थोर ।।४।।
सहज सिंहासनीं राजा रघुवीर।
सोहंभावे तया पूजा उपचार।
सहजांची आरती वाद्यांचा गजर।
माधवदासा स्वामी आठव ना विसर ।।५।।

✻ ✻ ✻

# ✻ श्री मारुतीची आरती ✻

सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं।

करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं।

कडाडिले ब्रह्मांड धाके त्रिभुवनीं।

सुरवर नर निशाचार त्या झाल्या पळणी ।।१।।

जय देव जय देव जय श्रीहनुमंता।

तुमचेनी प्रसादें न भी कृतांता ।।धृ।।

दुमदुमले पाताळ उठिला प्रतिशब्द।

थरथरिला धरणीधर मानीला खेद।

कडकडिले पर्वत उड्डुगणउच्छेद।

रामीं रामदासा शक्तीचा शोध ।।२।।

✻ ✻ ✻

# ✻ श्री साईबाबांची आरती ✻

आरती साईबाबा। सौख्यदातार जीवा।

चरणरजातलीं। द्यावा दासां विसांवा।

भक्तां विसावा ।।धृ।।

जाळुनियां अनंग। स्वस्वरुपीं राहे दंग।

मुमुक्षुजनां दावी। निज डोळां श्रीरंग ।।१।।

जय मनी जैसा भाव। तया तैसा अनुभव।

दाविसी दयाघना। ऐसी तुझी ही माव ।।२।।

तुमचे नाम ध्याता। हरे संसृती व्यथा।

अगाध तव करणी। मार्ग दाविसी अनाथा ।।३।।

कलयुगीं अवतार। सगुणब्रह्म साचार।

अवतीर्ण झालासे। स्वामी दत्त दिगंबर ।।४।।

आठां दिवसां गुरुवारीं। भक्त करिती वारी।

प्रभुपद पहावया। भवभय निवारी ।।५।।

माझा निजद्रव्यठेवा। तव चरणरजसेवा।

मागणें हेंचि आतां। तुम्हां देवाधिदेवा ।।६।।

इच्छित दीन चातक। निर्मल तोय निजसुख।

पाजावें माधवा या। सांभाळ आपुली भाक ।।७।।

✻ ✻ ✻

## ✻ श्री नवरात्री देवीची आरती ✻

उदो बोला उदो बोला अंबाबाई माऊलीचा हो
उदोकारे गर्जती काय महिमा वर्ण तिचा हो ।।धृ।।

अश्विन शुद्धपक्षी अंबा बैसली सिंहासनी हो
प्रतिपदेपासूनी घटस्थापना ती करुनी हो
मूलमंत्र जप करुनी भोंवते रक्षक ठेवुनी हो
ब्रह्माविष्णू रुद्र आईचे पूजन करिती हो ।।१।।

द्वितीयेचे दिवशी मिळती चौसष्ट योगिनी हो
सकळामध्ये श्रेष्ठ परशुरामाची जननी हो
कस्तुरी मळवट भांगी शेंदूर भरुनी हो
उदोकारे गर्जती सकळ चामुंडा मिळोनी हो ।।२।।

तृतीयेचे दिवशी अंबे शृंगार मांडीला हो
मळवट पातळ चोळी कंठी हार मुक्ताफळा हो
कंठीची पदके कासे पितांबर पिवळा हो
अष्टभुजा मिरविसी अंबे सुंदर दिसे लीला हो ।।३।।

चतुर्थीचे दिवशी विश्वव्यापक जननी हो
उपासका पहासी माते प्रसन्न अंत:करणी हो
पूर्णकृपे पहासी जगन्माते मनमोहनी हो
भक्तांच्या माउली सूर ते येती लोटांगणी हो ।।४।।

पंचमीचे दिवशी व्रत ते उपांग ललिता हो
अर्ध पाद्य पूजेने तुजला भवानी स्तवती हो
रात्रीचे समयी करती जागरण हरीकथा हो
आनंदे प्रेम ते आले सदभावे क्रिडता हो ।।५।।

षष्ठीचे दिवशी भक्ता आनंद वर्तला हो
घेउनि दिवट्या हाती हर्षे गोंधळ घातला हो
कवडी एक अर्पिता देशी हार मुक्ताफळा हो
जोगवा मागता प्रसन्न झाली भक्त कुळा हो ॥६॥

सप्तमीचे दिवशी सप्तशृंग गडावरी हो
तेथे तु नांदसी भोवती पुष्पे नानापरी हो
जाईजुई शेवंती पूजा रेखियली बरवी हो
भक्त संकटी पडता झेलुन घेसी वरचेवरी हो ॥७॥

अष्टमीचे दिवशी अंबा अष्टभुजा नारायणी हो
सह्याद्री पर्वती उभी पाहिली जगद्जननी हो
मन माझे मोहिले शरण आलो तुज लागुनी हो
स्तनपान देउनि सुखी केले अंत:करणी हो ॥८॥

नवमीचे दिवशी नव दिवसांचे पारणे हो
सप्तशती जप होम हवने सद्भक्ती करुनी हो
षडरस अन्ने नेवैद्याशी अर्पियली भोजनी हो
आचार्य ब्राह्मणा तृप्त त्वा केले कृपे करुनी हो ॥९॥

दशमीचे दिवशी अंबा निघे सीमोल्लंघनी हो
सिंहारूढ करी दारुण अंबे शस्त्रे त्वा घेउनी हो
शुंभनिशूंभादिक राक्षसा किती मारसी राणी हो
विप्रा रामदासा आश्रम दिधला तो चरणी हो ॥१०॥

* * *

# ✻ श्री रेणुका माता आरती ✻

जय जय जगदंबे । श्री अंबे । रेणुके कल्पकदंबे । जय जय ।।धृ।।
अनुपम स्वरुपाची तुझी धाटी । अन्य नसे या सृष्टी ।
तुजसम रूप दुसरे, परमेष्टी । करिता झाला कष्टी ।
शशीरस रसरसला ,वदनपुटी । दिव्य सुलोचन दृष्टी ।
सुवर्ण रत्नांच्या, शिरी मुकुटी । लोपती रविशशी कोटी ।
गजमुखी तुज स्तविले हेरंबे । मंगल सकळारंभे ।। जय जय ।।१।।

कुमकुम चिरी शोभे मळवटी । कस्तुरी टिळक लल्लाटी ।
नासिक अति सरळ, हनुवटी । रुचिरामृत रस ओठी ।
समान जणू लवल्या, धनुकोटी । आकर्ण लोचन भ्रुकुटी ।
शिरी नीट भांगवळी, उफराटी । कर्नाटकची घाटी ।
भुजंग नीळरंगा, परी शोभे । वेणी पाठीवर लोंबे ।। जय जय ।।२।।

कंकण कनकाची मनगटी । दिव्य मुद्या दशबोटी ।
बाजूबंद नगे बाहुवटी । चर्चुनी केशर उटी । सुगंधी पुष्पांचे हार कंठी ।
बहु मोत्यांची दाटी । अंगी नवी चोळी, जरीकाठी । पीत पितांबर तगटी ।
पैंजण पदकमळी, अति शोभे । भ्रमर धावती लोभे ।। जय जय ।।३।।

साक्षप तू क्षितिच्या तळवटी । तूचि स्वये जगजेठी ।
ओवाळीत आरती, दिपताटी । घेऊनी कर संपुष्टी ।
करुणामृत हृदये, संकटी । धावसी भक्तांसाठी ।
विष्णूदास सदा, बहुकष्टी । देशील जरी नीजभेटी ।
तरी मग काय उणे, या लाभे । धाव पाव अविलंबे ।। जय जय ।।४।।

✻ ✻ ✻

## ✻ श्री गजानन महाराजांची आरती ✻

जय जय सतचित् स्वरूपा स्वामी गणराया।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया। जयदेव जयदेव ।।धृ।।

निर्गुण ब्रह्म सनातन अव्यय अविनाशी। स्थिरचर व्यापून उरले जे या जगतासी।
ते तू तत्त्व खरोखर नि:संशय असती। लीलामात्रे धरिले मानव देहासी।।
जयदेव जयदेव ।।१।।

होऊ न देशी त्याची जाणिव तू कवणा। करूनी 'गणि गण गणांत बोते' या भजना।
धाता हरिहर गुरूवर तूचि सुखसदना। जिकडे पहावे तिकडे तू दिससी नयना ।।
जयदेव जयदेव ।।२।।

लीला अनंत केल्या बंकट सदनास। पेटविले त्या अग्नीवाचूनि चिलमेस।
क्षणांत आणिले जीवन निर्जल वापीस। केला ब्रह्मगिरीच्या गर्वाचा नाश।।
जयदेव जयदेव ।।३।।

व्याधी वारून केलें कैका संपन्न। करविले भक्तालागी विठ्ठल दर्शन।
भवसिंधू हा तरण्या नौका तव चरण। स्वामी दासगणूचे मान्य करा कवन।।
जयदेव जयदेव ।।४।।

✻ ✻ ✻

## * कर्पूरारती *

कर्पूरगौरं करुणावतारं संसारसारं भुजगेन्द्रहारम्।

सदा वसन्तं हृदयारविन्दे भवं भवानीसहितं नमामि॥

मंदार माला, कपालकाय। कपालमाला शिवशंकराय।

दिगंबरायै च दिगंबराय । नमः शिवायै च नमः शिवाय।

कर्पूर निरांजन धुपम दीपम समर्पयामी ।।

## * घालीन लोटांगण *

घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यांनि पाहीन रूप तझे।
प्रेमें आलिंगिन आनंदे पूजिन। भावें ओवाळीन म्हणे नामा ।।१।।

त्वमेव माता पिता त्वमेव। त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव। त्वमेव सर्वं मम देवदेव ।।२।।

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा। बुध्द्यात्मना वा प्रकृतिस्वभावात्।
करोमि यद्यत् सकलं परस्मै। नारायणायेति समर्पयामि ।।३।।

अच्युतं केशवं रामनारायणं। कृष्णदामोदरं वासुदेवं हरी ।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं। जानकीनायकं रामचंद्रं भजे ।।४।।

हरे राम हरे राम, राम राम हरे हरे।
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे।।

* * *

## ✻ मंत्रपुष्पांजली ✻

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्। ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः।। ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे। स मे कामान् काम कामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु। कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः।। ॐ स्वस्ति साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं, पारमेष्ठ्यं, राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समंत पर्या ईस्या्त् सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात्। पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिती। तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरूतः परिवेष्टारो मरूत्तस्यावसन् गृहे। आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति।।

## ✻ गायत्री मंत्र ✻

ॐ एकदन्ताय विद्महे, वक्रतुण्डाय धीमहि,तन्नो दन्तिः प्रचोदयात् ॥
ॐ महालक्ष्म्यै च विद्महे, विष्णूपत्न्यै च धीमहि तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात् ॥
ॐ नारायणाय विद्महे, वासुदेवाय धीमहि तन्नो विष्णुः प्रचोदयात् ॥
ॐ तत्पुरुषाय विद्महे, महादेवाय धीमहि तन्नो रुद्रः प्रचोदयात् ॥
ॐ दिगंबराय च विद्महे, अत्रिपुत्राय धीमहि तन्नो दत्तः प्रचोदयात् ॥
ॐ दिगंबराय च विद्महे, गण गण गणांत बोते च धीमहि तन्नो
सद्गुरु गजाननः प्रचोदयात् ॥
ॐ भक्तवरदाय विद्महे, पांडुरंगाय धीमहि तन्नो कृष्णः प्रचोदयात् ॥

॥ मंत्र पुष्पांजलीम समर्पयामी ॥ नमस्कारम करोमी ॥

✻ ✻ ✻

## ✻ प्रार्थना ✻

सदा सर्वदा योग तुझा घडावा।
तुझे कारणी देह माझा पडावा।।
उपेक्षूं नको गुणवंता अनंता।
रघुनायका मागणें हेंचि आतां।।

उपासनेला दृढ चालवावें।
भुदेव-संतासि सदा नमावें।।
सत्कर्मयोगें वय घालवावें।
सर्वामुखी मंगल बोलवावें।।

ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे।
त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे।।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी।
तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

## ✻ प्रदक्षिणा ✻

यानि कानि च पापानि जन्मान्तरकृतानि च।
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिणां पदे पदे।।

## ✻ क्षमा प्रार्थना ✻

आवाहनं न जानामि न जानामि तवार्चनम।
पूंजा चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वर।।

मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर।
यत्पूजितं मया देव परिपूर्णं तदस्तु मे।।

अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम।
तस्मात्कारुण्यभावेन रक्ष रक्ष परमेश्वर।।

✻ ✻ ✻

## ✻ श्री गजानन महाराज स्तुती स्तोत्र ✻

अचिंत्य जगताप्रती कृति तुझी न कोणा कळे ।
असो खलहि केवढा तव कृपे सुमार्गी वळे ।।
उणें पुढति ये तुझ्या खचित रत्नचिंतामणी ।
शिरीं सतत माझिया वरदहस्त ठेवा झणीं ।।

।। श्री समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय ।।

हे पूर्ण ब्रह्म जगचालक ज्ञानराशी । ऐसे युगायुगी किती अवतार घेसी ।
झाल्यास दर्शन तुझे, भय रोग चिंता । नासे गजाननगुरो, मज पाव आता ।।

।। श्री समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय ।।

**अनंतकोटी ब्रह्माण्डनायक महाराजाधिराज योगिराज**
**परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी**
**समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय।।**

✻ ✻ ✻

# ✻ प्रदक्षिणा ✻

धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची, माझ्या श्री गुरु रायाची
झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची, झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची ।।धृ।।

पदोपदी अपार झाल्या पुण्याच्या राशी, झाल्या पुण्याच्या राशी
सर्वहि तीर्थे घडली आम्हा आदि करुनि काशी ।।१।।

मृदूंग टाळ घोळ भक्त भावार्थे गाती, भक्त भावार्थे गाती
नामसंकीर्तने नित्यानंदे नाचती ।।२।।

कोटी ब्रह्म हत्या हरिती करीता दंडवत, हरिती करिता दंडवत
लोटांगण घालिता मोक्ष लोळे पायात ।।३।।

गुरुभजनाचा महिमा नकळे आगमा निगमासी, न कळे आगमा निगमासी
अनुभव ते जाणती जे गुरु पदीचे रहिवासी ।।४।।

प्रदक्षिणा करोनि देह भावे वाहिला, देह भावे वाहिला
श्रीरंगात्मज विठ्ठल पुढे उभा राहिला ।।५।।

गजानना गजानना श्रीमद् सद्गुरु गजानना
गजानना गजानना रक्षी सगळ्या भक्तगणा
गजानना गजानना अवलीया तु गजानना
गजानना गजानना भक्त वत्सला गजानना
गजानना गजानना शेगांवींच्या गजानना

गजानन गजानन गजानन गजानन गजानन गजानन
गजानन गजानन गजानन गजानन गजानन गजानन

✻ ✻ ✻

# ✼ प्रसाद हा मज द्यावा ✼

प्रसाद हा मज द्यावा देवा । प्रसाद हा मज द्यावा
सहवास तुझाची घडावा देवा । प्रसाद हा मज द्यावा देवा ।।धृ।।

निशीदिनी प्रभुचे नाम स्मरावे । विसर तुझा न पडावा देवा
प्रसाद हा मज द्यावा देवा । प्रसाद हा मज द्यावा ।।१।।

हृदय मंदिरी तुवां बैसुनी । ध्यान योग मज द्यावा देवा
प्रसाद हा मज द्यावा देवा । प्रसाद हा मज द्यावा ।।२।।

हरि भजनामृत निशीदिनी पाजूनी । जन्म मृत्यु चुकवावा देवा
प्रसाद हा मज द्यावा देवा । प्रसाद हा मज द्यावा ।।३।।

आत्मसुता परी प्रसाद द्यावा । वियोग तव न घडावा देवा
प्रसाद हा मज द्यावा देवा । प्रसाद हा मज द्यावा ।।४।।

✼ ✼ ✼

# ✻ भूपाळी ✻

उठा उठा हो सद्‌गुरुराया सरली ती राती ।। दयाळा ।।
उषःकालचा वाहे वारा कुक्कुट ओरडती ।।धृ।।

सूर्य सारथी अरुणा पाहून प्राची निजचित्ती ।
गेला होऊनि अति आनंदित ते मी वानुं किती ।।१।।

ऊलुक पिंगळे झाले भयभीत पाहुनी अरुणाला ।
प्राचि प्रांत तो सद्‌गुरुराया लालीलाल झाला ।।२।।

चक्रवाक् चंडोल पक्षी ते प्रभातकालाला ।
सुर्या बघण्या आतुर होऊनि घालिति घिरटयाला ।।३।।

तेंवी बघण्या तुला पातालें भक्त तुझे द्वारीं।
दर्शन देऊनी तयास तारा गणू म्हणे संसारी ।।४।।

✻ ✻ ✻

## ✻ शेजारती ✻

आतां स्वामी सुखें निद्रा करा अवधुता । निद्रा करा अवधुता ।
चिन्मय, सुखधामी जाऊनी, पहुडा एकांता ।।१।।

वैराग्याचा कुंचा घेऊनी चौक झाडीला । गुरु हा चौक झाडीला ।।
तयावरी सप्रेमाचा शिडकावा केला ।।२।।

पायघड्या घातल्या सुंदर नवविधा भक्ती । सुंदर नवविधा भक्ती ।।
ज्ञानाच्या समया उजळुनी लाविल्या ज्योति ।।३।।

भावार्थाचा मंचक ह्रदयाकाशीं टांगिला । ह्रदयाकाशीं टांगिला ।।
मनाची सुमनें करूनी केलें शेजेला ।।४।।

द्वैताचे कपाट लोटुनी एकत्र केले । गुरु हे एकत्र केले ।।
दुर्बुध्दीच्या गांठी सोडुनी पडदे सोडीले ।।५।।

आशा तृष्णा कल्पनेचा सांडुनी गलबला । गुरु हा सांडुनी गलबला ।।
दया क्षमा शांती दासी उभ्या शेजेला ।।६।।

अलक्ष उन्मनी घेउनी नाजुकसा शेला । गुरु हा नाजुकसा शेला ।।
निरजंनी सद्गुरु माझा निजे शेजेला ।। ७।।

✻ ✻ ✻

# ✲ श्री गजानन प्रार्थना स्तोत्र ✲

## ।। संतकवी श्री दासगणूविरचित ।।

## ।। श्री गजानन प्रार्थना स्तोत्र ।।

## ।। श्री गणेशाय नमः ।।

हे सर्वाद्या सर्वशक्ती । हे जगदोद्धारा जगत्पती । साह्य व्हावें सत्वरगति । या लेकरांकारणें ॥१॥

जे जे काही ब्रह्माण्डात । तें तें तुझें रुप सत्य । तुझ्यापुढे नाहीं खचित । कोणाचीही प्रतिष्ठा ॥२॥

तूं निरंजन निराकार । तूंच अवधूत दिगंबर । साकाररुप सर्वेश्वर । विश्वनाथ तूंच की ॥३॥

जें जें कांही म्हणावें । तें तें तुझे रुप बरवें । दासगणूस आतां पावे । हीच आहे याचना ॥४॥

तूंच काशी विश्वेश्वर । सोमनाथ बद्रिकेदार । महांकाल तेवि ओंकार । तूंच की रे त्र्यंबकेश्वरा ॥५॥

भीमाशंकर मल्लिकार्जून । नागनाथ पार्वतीरमण । श्री घृष्णेश्वर म्हणून । वेरुळगांवी तूंच कीं ॥६॥

तूंच परळी वैजनाथ । निधीतटाला तूंच स्थित । रामेश्वर पार्वतीकांत । सर्व संकट निवारता ॥७॥

हे कृपार्णवा नारायणा । महाविष्णो आनंदधना । हे शेषशायी परिपूर्णा । नरहरि वामना रघुपते ॥८॥

तूं वृंदावनीं श्रीहरी । तूं पांडुरंग पंढरपुरीं । व्यंकटेश तूं गिरीवरीं । पुरीमाजीं जगन्नाथ ॥९॥

द्वारकेसी नंदनंदन । नाम देती तुजकारण । जैसें भक्तांचें इच्छील मन । तैसे तुज ठरविती ॥१०॥

आता हे चंद्रभागातटविहारा । या गजानन स्तोत्रा साह्य करा । हेंच मागणें पसरुनि पदा । तुज विठ्ठलें दासगणू ॥११॥

गजानन जें स्वरूप कांही । तें तुझ्याविण वेगळें नाही । दत्त भैरव मार्तंड तेही । रुपें तुझीच अधोक्षजा ॥१२॥

या सर्व स्वरुपांकारण । आदरें मी करी वंदन । माझे त्रिताप करा हरण । हेंच आहे मागणें ॥१३॥

हें महालक्ष्मी कुलदेवते । कृपाकटाक्षं लेकरातें । पाही दासगणूतें । हीच तुजला प्रार्थना ॥१४॥

आतां श्रीशंकराचार्य गुरुवर । तेवी नाथ मच्छिंदर । निवृत्तीदास ज्ञानेश्वर । समर्थ सज्जनगडीचे ॥१५॥

हे तुकारामा महासंता । तुजलागी दंडवता । करिता होई मला त्राता । नाहीं ऐसे म्हणू नका ॥१६॥

हे शिर्डीकर बाबासाई । लेकरांसाठी धांव घेई । वामनशास्त्री माझे आई । माझी उपेक्षा करूं नका ॥१७॥

हे शेगांवीच्या गजानना । महासंता आनंदघना । तुला येऊं दे काहीं करुणा । या अजाण दासगणूची ॥१८॥

तुम्हां सर्वा प्रार्थून । स्तोत्र करितो हें लेखन । माझ्या चित्तीं म्हणून । वास आपण करावा ॥१९॥

जें जें तुम्ही वदवाल कांही । तेंच लिहीन कागदीं पाहीं । स्वतंत्रता मजला नाही । मी पोषणा तुमचा असें ॥२०॥

माघमासी सप्तमीस । वद्यपक्षीं शेगांवांत । तुम्ही प्रगटला पुण्यपुरुष । पंथाचिया माझारी ॥२१॥

उष्टया पत्रावळी शोधन । तुम्हीं केल्या म्हणून । मिळालें कीं नामाभिधान । पिसा पिसा ऐसें तुम्हा ॥२२॥

उगी न वाढावी महती । म्हणून ऐसी केली कृती । तुम्ही साच गुरुमूर्ती । लपून बसाया कारणे ॥२३॥

परि विचारवंत जे ज्ञानी । तें तुम्हांलागी पाहुनी । भ्रमा हातफळी देऊनी । पाय तुमचे वंदितात ॥२४॥

बंकटलाल दामोदर । हे दोघे चतुर नर । भ्रमातें सारुन दूर । शरण आले तुम्हांला ॥२५॥

बंकटलालाचें सदनास । तुम्ही राहिला कांही दिवस । तेथे जानराव देशमुखास । मरत असतां वांचविले ॥२६॥

केवळ पाजुनियां तीर्था । आपुल्या पदींचे समर्था । तुजलागीं दंडवता । असो आमुचा वरचेवर ॥२७॥

तुझिया लीलानिधीचा । नच लागे पार साचा । टिटवीनें सागराचा । अंत कसा घेववेल ? ॥२८॥

पितांबरा देऊनी भोपळा । नाल्यास तुम्ही पाठविला । जल तें हो आणविण्याला तहान लागली म्हणून ॥२९॥

पितांबरासी बजाविलें । ओंजळीने पाणी भले । न पाहिजे तुंवा भरले । या माझिया भोपळयांत ॥३०॥

जलांत तुंबा बुडवावा । जलें पूर्ण भरुन घ्यावा । आणि तोच मला आणून द्यावा । यांत अंतर करूं नको ॥३१॥

तुंबा बुडेल ऐंसे पाणी । नव्हतें नाल्यालागुनी । विश्वास ठेवोनिया वचनीं । ऐसें केलें पितांबरे ॥३२॥

नाल्याचिया जलासी । तुंबा तो लावितां सरसी । आपोआप त्या ठायासी । भव्य खांच पडली कीं ॥३३॥

तुंबा त्यांत भरत आला । ऐशी तुझी अगाध लीला । ती साच वर्णण्याला । शेषही थकेल वाटतें ॥३४॥

सोमवारी प्रदोषासी । बंकटलालच्या सदनासी । भाविकां आपण व्योमकेशी । दिसतसा महाराजा ॥३५॥

यात नवल ना तिळभर । कां कीं तूंच शंकर रमावर । हे जेवढे चराचर तेवढे तुम्हींच आहात की ॥३६॥

तुझें स्वरुप यथातथ्य । मानवासी नाहीं कळत । म्हणून पडती भ्रमांत । मायावश होऊनी ॥३७॥

प्रातःकालचे वेळीं । संपली होती दिवासळी । जानकीराम देईना मुळीं । विस्तव तुमच्या चिलमीस ॥ ३८॥

जानकीराम सोनार । बागेसरीचा वैश्वानर । द्यावयासी कुरकुर । करूं लागला असे कीं ॥३९॥

तें अंतर्ज्ञानं जाणून । कौतुक दाविलें करुन । चिलीम विस्तवांवाचून । पेटूनिया दाविली ॥४०॥

सोनार विस्तव देण्याला । नाहीं ऐसे वदला । म्हणूनिया येता झाला । राग भगवंताकारणें ॥४१॥

चिंचवणें तें सोनाराचें । नासलें अक्षय तृतीयेंचें । प्राणघातक किडयांचे । झालें त्यांत साम्राज्य ॥४२॥

अवघे टकमका पाहती । नाका पदर लाविती । एकमेका सांगती । हें चिंचवणे खाऊं नका ॥४३॥

मग जानकीराम म्हणाला । साधूस विस्तव मी ना दिला । त्याचा हा प्रत्यय आला । धन्य धन्य हा गजानन ॥४४॥

मग तात्काळ उठून वेगेंसी । आला बंकट सदनासी । हकीकत बंकटलालासी । सर्व केली निवेदन ॥४५॥

बंकटलालाचे वशिल्यानें । चरण धरीलें सोनारानें । अनन्यभाव भक्तींने । गजाननाचे तेधवां ॥४६॥

गुरुराया अंतर । मऊ आपले साचार । तेंच कां हो केले कठोर । मजविषयीं समर्था ॥४७॥

आतां या चिंचवण्यासी । हात लावा पुण्यराशी । त्याविण मी सदनासी । न जाय येथून ॥४८॥

ऐसी त्याची ऐकून गिरा । चिंचवण्यासी लाविले करा । चिंचवणें तोच झाला झरा । अमृताचा विबुधहो ॥४९॥

यापरी जानकीराम शरण आला । अखेर आपुल्या पदाला । मुकीनचंदु कृतार्थ केला । खाऊन दोन कान्हवले ॥५०॥

माधव नामें चिंचोलीचा । ब्राह्मण एक होता साचा । त्यास बोध अध्यात्माचा । तुम्हीच एक केलात ॥५१॥

भ्रांती त्याची उठविली । प्रपंच माया तोडिली । मोक्ष पर्वणी लाधली । तया माधवाकारणें ॥५२॥

ऐसें आपुलें महिमान । श्रेष्ठ आहे सर्वाहून । पदरी असल्या विपूल पुण्य । पाय तुझे सांपडती ॥५३॥

वसंत पूजेकारण । घनपाठी ब्राम्हण । आणविलेत आपण । ऐनवेळी तेधवां ॥५४॥

बंकटलालें आपणांसी । नेलें खावया मक्यासी । आपुलिया मळयासी । अति आग्रह करुनी ॥५५॥

मोहळें होती मळयांत । मधमाशांची भव्य सत्य । तीं पेटविता आगटीप्रत । उठतीं झालीं निजलीलें ॥५६॥

मधमाशाशी पाहून । लोक करिती पलायन । भय जिवाचें दारुण । आहे की प्रत्येकाला ॥५७॥

तुम्ही मात्र निर्धास्त । बैसता झाला मळयांत । मधमाशा अतोनांत । बसल्या तुमच्या अंगावरी ॥५८॥

लोक दुरुन पाहती । परि न कोणाची होय छाती । तुम्हां सोडवाया गुरुमूर्ती । मधमाशांच्या त्रासांतून ॥५९॥

बंकटलाल दुःखी झाला । पाहून त्या माशांला । त्यांनी मात्र थोडा केला । प्रयत्न तुम्हा सोडविण्यांचा ॥६०॥

कांही वेळ गेल्यावरी । तुम्हीच आज्ञा केली खरी । मधमाशांस जाया दुरी । तें अवघ्यांनी पाहिले ॥६१॥

आपुल्या आज्ञेनुसार । मधमाशा झाल्या दुर । बंकट म्हणे सोनार । आणवितों कांटे काढावया ॥६२॥

कां कीं मधमाशांचे काटे । रुतले असतील मोठें । ते लपून बसती बेटे । स्वामी अवघ्या शरिरांत ॥६३॥

म्हणून ते काढावया । सोनार आणवितो ये ठाया । आपण म्हणालात वाया । हा त्रास घेऊ नका ॥६४॥
योगशास्त्र येतें मला । मी योगबलें कांट्याला । बाहेर काढितों त्याजला । सोनार कशास पाहिजे ॥६५॥
ऐसें वदून कुंभक केला । तेधवां की आपण भला । तेणें बाहेर कांट्याला । पडणें अवश्य झाले की ॥६६॥
हे कौतुक सर्वांनी । पाहिलें त्या ठिकाणी । जो तो मनुष्य जोडी पाणि । स्वामी आपणांकारणें ॥६७॥
आपण म्हणाला त्यावर । हे जीवांनो घटकाभर । बैसा या वृक्षावर । आतां कोणास चावूं नका ॥६८॥
संकल्प बंकटलालाचा । पूर्ण करणें आहे साचा । सोहळा मका सेवण्यांचा । निर्विघ्न त्याचा होऊं द्या ॥६९॥
पहा माशा उठतां क्षणी । तुम्ही गेलात पळूनी । संकट येतां नाही कोणी । तारिता हे ध्यानीं धरा ॥७०॥
लाडू, पेढे खावयास । लोक जमती विशेष । परि साह्य संकटास । कोणीही करीना ॥७१॥
हें तत्व ध्यानी धरा । ईश्वरासी आपुला करा । म्हणजे सफल होय खरा । तुमचा की संसार ॥७२॥
ऐसा उपदेश भक्ताप्रती । साच केलात गुरुमूर्ती । एक्या मुखें करुं किती । मी आपुलें वर्णन ॥७३॥
कृष्णाजीचें मळयांत । दांभिक गोसावी आले बहुत । जे होते सांगत । शुष्क वेदांत जगाला ॥७४॥
त्या गोसाव्यांचा ब्रह्मगिरी । महंत आणिला वाटेवरी । जो जळत्या पलंगावरी । तुम्हांजवळ ना बैसला ॥७५॥
चहूंकडून होता पेटला । तो अग्नी आपण शांत केला । तेणें त्या ब्रह्मगिरीला । कौतुक अति वाटले ॥७६॥
सर्व अभिमान सोडून । आपणां तो आला शरण ।अग्नीचें ते अग्नीपण । चांदण्यापरी केलें तुम्ही ॥७७॥
टाकळीकर हरिदासाचा । घोडा अति द्वाड साचा । तुम्ही हरविला तयाचा । द्वाडपणा तो क्षणांत ॥७८॥
घोडा आज्ञेत वागला । तो सर्वांनी पाहिला । अशक्य कांही आपणाला । नाही उरलें जगांत ॥७९॥
अडगांव आकोली गांवात । कावळे शिरतां भंडा-यात । आपण पळविले क्षणांत । आज्ञा त्यासी करुन ॥८०॥
अजूनपर्यंत त्या ठायी । कावळा येना एकही । संत जे वदतील कांही । खोटे होय कोठून ॥८१॥
प्रखर असुनी उन्हाळा । निर्जनशा काननाला । ऐन दुपारचे समयाला । कौतुक केले अभिनव ॥८२॥
आकोलीच्या रानांत । सर्व्हे नंबर बावन्नात । एका शुष्क गर्दाडाप्रत । बनविली तुम्ही पुष्करिणी ॥८३॥
भक्त आपुला पितांबर । कृपा होती त्याचेवर । तयाचाही अधिकार । थोर आपण बनविला ॥८४॥
ज्योतीप्रत मिळाल्या ज्योत । भेद कांही न तेथे उरत । खराच पितांबर पुण्यवंत । साक्षात्कारी जाहला ॥८५॥
वठलेल्या आंब्याला । त्यांनी आणविला पाला । कोंडोली ग्रामाला । हे कृत्य झालें कीं ॥८६॥

भीमा अमरजा संगमासी । क्षेत्र गाणगापुरासी । पर्णे फुटली टोणप्यासी । नरसिंह सरस्वती कृपेनें ॥८७॥

तेंच कृत्य कोंडोलीतें । करविले पितांबरा हातें । आपणची गुरुमुर्ते हे स्वामी समर्था ॥८८॥

वद्य पक्षांत माघमासी । सोमवतीच्या पर्वासी । क्षेत्र ओंकारेश्वरासी । गेले असतां भक्त तुमचें ॥८९॥

तेथें महानदी नर्मदेंत । नौका फुटली अकस्मात । पाणी येऊं लागले आंत । नाव बुडूं लागली ॥९०॥

त्या नौकेंत आपण होतां । म्हणून नर्मदा लावी हातां । फुटलेल्या ठायी तत्वतां । ऐसा प्रभाव आपुला हो ॥९१॥

नौका कांठास लाविली । नर्मदेनें आणून भली । आपणां वंदून गुप्त झाली । हे बहुतांनी पाहिलें ॥९२॥

त्र्यंबक पुत्र कवराचा । आपुला भक्त होता साचा । जो अभ्यास वैद्यकीचा । हैद्राबादी करीत असे ॥९३॥

त्याची कांदा भाकर। आपण केली गोड फार । पदार्थ सारूनियां दूर । इतरांनी आणलेले ॥९४॥

जैसा द्वारकाधीश भगवान । कौरवांचे पक्वान्न । सांडूनिया भक्षण करी विदुर कण्यांचे ॥९५॥

तैसेच आपण केलें । कवराचें अन्न भक्षिलें ।ख-या भक्तीचें भुकेले । आपण आहा महाराजा ॥९६॥

सवळदचा गंगाभारती । तया फुटली रक्तपिती । तो त्रासून जिवाप्रती । आला असतां आपणाकडे ॥९७॥

लोक अवघे तिटकारा । करुं लागलें त्याचा खरा । कोणी न देती त्यास थारा । रोगभयें करुन ॥९८॥

त्या गंगाभारतीस । येऊं न देती दर्शनास ।कोणी आपल्या शेगांवास । ऐसी स्थिती जाहली ॥९९॥

लोक म्हणती तयाप्रत । मिसळू नकोस लोकांत । त्रास न द्यावा यत्किंचित । तूं समर्थाकारणें ॥१०० ॥

तो गोसावी एके दिवशी । आला आपल्या दर्शनासी । डोई ठेवतां पायांसी । मारिलें आपण तयाला ॥१॥

थोबाड झोडिलें दोन्ही हातें । लाथ मारुन कमरेंते ।उलथून पाडिला रस्त्यातें । थुंकून त्याच्या अंगावरी ॥ २ ॥

बेडका पडतां अंगावर । गंगाभारती हर्षला फार ।म्हणे आतां होईल दूर । व्याधी माझी निःसंशय ॥३॥

जो बेडका होता पडला । तोच त्याने मलम केला । अवघ्या अंगास लाविला । चोळचोळूनी निज हातें ॥४॥

ऐशा रितीं सेवा करीत । राहिला गोसावी शेगांवांत ।तयाच्या महारोगाप्रत । आपण की हो निवटिलें ॥५॥

तुमच्या कृपेचिया पुढें । औषध काय बापुडे । अमृत तेंही फिके पडे। ऐसा महिमा अगाध ॥६॥

कोणतेंही संकट जरी । येऊन पडले भक्तांवरी । तें निजकृपेने करितां दुरी । आपण साच दयाळा ॥७॥

संकटीं खंडू पाटलाप्रत । आपण देऊन कृपेचा हात । न्यायाधिशाचें कचेरीत । निर्दोष त्यासी सोडिलें ॥८॥

बाळकृष्ण रामदासी । होता बाळापूर ग्रामासी । त्या माघ वद्य नवमीसी । समर्थदर्शन घडविलें ॥९॥

घटकेत दिसावा गजानन । घटकेंत सूर्याजीपंत नंदन । घटकेंत भजन तें गणगण । घटकेंत जयजय रघुवीर असे ॥११०॥

तेणें बाळकृष्ण घोटाळला । अखेर ओळखून आपणांला ।समर्थ म्हणूनी नमस्कार केला । काय लीला वानूं ती ॥११॥

संत अधिकारें समान । मुळीं न तेथे अधिक न्यून । जैसे भक्तांचे इच्छी मन । तैशी रूपे दिसती तया ॥१२॥

गणेशदादा खापर्डे । उमरावतीचे गृहस्थ बडे । कृपादृष्टीनें त्यांकडे । पाहिले आपण सर्वदा ॥१३॥

या खापर्ड्यांला व-हाड प्रांतीं । अनभिषिक्त राजा बोलती । राष्ट्रोद्धाराची तळमळ ती । होती खार्पड्याकारणें ॥१४॥

कोठे न आले अपयश त्याला । हा तुमच्या कृपेचा महिमा झाला । बाळ गंगाधर टिळकाला । तुम्हीच कृपा केलीत ॥१५॥

भगवंतानें अर्जुनाला । भगवद्गीतेचा उपेदश केला । ज्या गीतेने जगाला । थक्क करुन सोडीलें ॥१६॥

पार्थ देवाचा भक्त जरी । राहिला वनवासाभीतरी । बारा वर्षे कांतारी । ऐसें भागवत सांगते ॥१७॥

भगवंताचा वशिला । प्रत्यक्ष असून अर्जुनाला । वनवास तो नाही चुकला । तैसेच झालें टिळकांचें ॥१८॥

संतकृपा असून । शिक्षा झाली दारुण । ब्रह्मदेशी नेऊन । मंडाल्याशीं ठेविलें त्या ॥१९॥

श्रोतें त्याच मंडाल्यात । गीतारहस्य केला ग्रंथ । जो आबालवृद्धांप्रत । मान्य झाला सारखा ॥१२०॥

कोल्हटकरा हातें भला । आपण होता पाठविला । भाकरीच्या प्रसादाला । मुंबईत टिळकाकारणें ॥२१॥

फळ हें त्या प्रसादाचें। गीतारहस्य होय साचें । भाष्यकार गीतेचे । हे सहावे झाले की ॥२२॥

पहिले शंकराचार्य गुरुवर । दुसरे रामानुजाचार्य थोर । मध्व, वल्लभ त्यानंतर । भाष्यकार जाहलें ॥२३॥

पांचवी ज्ञानेश्वर माऊली । भावार्थदीपिका टिका केली । जी मस्तकी धारण केली । अवघ्या मुमुक्षु जनांनी ॥२४॥

ज्ञानेश्वरा नंतर । एक दोन टिकाकार । झाले परी ना आली सर । त्यांना ज्ञानेश्वर माऊलीची ॥२५॥

वामनाची यथार्थदीपिका । तैसाच गीतार्णव देखा । हेहीं ग्रंथ भाविका । कांही अंशे पटले कीं ॥२६॥

गीतेचा अर्थ कर्मपर। लावी बाळ गंगाधर । त्या टिळकांचा अधिकार । वानाया मी समर्थ नसे ॥२७॥

मागील टीका समयानुसार । अवतरल्या या भूमीवर । तैसाच आहे प्रकार । या गीतारहस्याचा ॥२८॥

त्या लोकमान्य टिळकांवरी । आपण कृपा केली खरी । म्हणून तयाचा झाला करी । गीतारहस्य महाग्रंथ ॥२९॥

खामगांवी डॉक्टर कवरा । तीर्थ आणि अंगारा । आपण नेऊन दिलांत खरा । ब्राह्मणाच्या वेषानें ॥१३०॥

ज्यायोगें व्याधी त्याची । समुळ हरण झाली साची । तुम्ही काळजी भक्तांची । अहोरात्र वहातसां ॥३१॥

कन्या हळदी माळयाची । बायजा नामें मुंडगांवची । ही तुमच्या कृपे जनीची । समता पावती झालीसे ॥३२॥

वरदहस्त बायजाशिरीं । तुम्ही ठेवितां निर्धारी । तिही झाली अधिकारी । केवळ तुमच्या कृपेनें ॥३३॥

मुंडगांवच्या पुंडलीकाला । होता जरी प्लेग झाला । तो येता दर्शनाला । व्याधी दुर्धर हरिली तुम्ही ॥३४॥

सद्भक्त बापून्याप्रती । तुम्ही भेटविला रुक्मणीपती । नाहीं अशक्य कोणती । गोष्ट आपणांकारणें ॥३५॥

एके वेळी आपणाला । गोपाळ बुटी घेऊन गेला । भोसल्याच्या नागपुराला । अती आग्रह करुन ॥३६॥

गोपाळ बुटी श्रीमंत भारी । हजारों पंक्तीं त्यांचे घरीं । उठूं लागल्या वरचेवरी । केवळ आपल्या प्रित्यर्थ ॥३७॥

इकडे शेगांव सुनें पडलें । प्रेतवत दिसूं लागलें । मुखीं तेज नाहीं उरलें । मुळींच पाटील मंडळीच्या ॥३८॥

शेगांवीचे पुष्कळ जन । आले नागपूरा जाऊन । परि न झालें दर्शन । समर्थांचे कोणाला ॥३९॥

चौक्या पहारे सभोंवार । कडेकोट होते फार । समर्थांच्या पायांवर । शीर ठेवणे मुष्कील झालें ॥१४०॥

नागपूराहून आपणाला । आणण्या हरि पाटील निघाला । दहा पांच संगतीला । भक्त घेऊन शेगांवचे ॥४१॥

आला सिताबर्डीसी । गोपाळ बुटीच्या सदनाशी । तो तेथे दारापाशीं । शिपाई पाहिले दोन चार ॥४२॥

शिपायांनी पाटलाला । जरी होता अटकाव केला । परि तो न त्यांनी जुमानिला। बळकट होता म्हणून ॥४३॥

हरि पाटील शिरला आंत । गडबड झाली तेथे बहुत । तुम्ही धावून त्याचा हात । धरिलात की प्रेमानें ॥४४॥

जैसे वासरासी पाहातां । गाय धावे पुण्यवंता । तैसेच तुम्ही समर्था । केलेंत घरी बुटीच्या ॥४५॥

गोपाळ बुटी धांवत आले । हरि पाटला विनविते झाले । पाटिल माझें ऐकलें । पाहिजे तुम्ही थोडेसें ॥४६॥

भोजनोत्तर समर्थाला । जा घेऊन शेगांवाला । तो आहे भक्तीस विकला । शेगांवकरांच्या नि:संशय ॥४७॥

सर्वांचे झाल्या भोजन । आपण निघाला तेथून । आशीर्वाद तो देऊन । गोपाळ बुटीच्या कुटुंबाला ॥४८॥

त्या पाटील हरिवरी । कृपा आपुली अत्यंत खरी । श्रीकल्याणस्वामीपरी । सेवेस आपुल्या तत्पर जो ॥४९॥

हरि पाटलाकारण । स्वामी तुमचे द्वयचरण । हेंच महानिधान । जोडलें ऐसें वाटतसे ॥१५०॥

धार कल्याणचें रंगनाथ । आले तुम्हां भेटण्याप्रत । गुरुराया या शेगांवात । शेगांवचे भाग्य मोठें ॥५१॥

श्रीवासुदेवानंद सरस्वती । जे प्रत्यक्ष दत्तमुर्ती । ऐशा जगमान्य विभूति । आल्या आपल्या दर्शना ॥५२॥

जरी आपण देह ठेविला । तरी पावतसा भाविकाला । याचा अनुभव रतनसाला। आला आहे दयानिधे ॥५३॥

रामचंद्र कृष्णाजी पाटील । भक्त तुमचा प्रेमळ । त्याची तुम्ही पुरविली आळ । गोसाव्याच्या रुपाने ॥५४॥

तैसेच बोरीबंदरावरी। जांजळ जो का लक्ष्मण हरी । त्याला भेट दिली खरी । परमहंस रुपानें ॥५५॥

तुमच्या लीलेचा तो पार । कोणा न लागे तिळभर । मुंगी मेरुमांदार । आक्रमण कैशी करी ॥५६॥

टिटवीच्यानें सागर । शोषवेल का साचार । दासगणू हा लाचार । आहे सर्व बाजूने ॥५७॥

आपली वर्णण्या लीला । महाकवीच पाहिजे झाला । मजसारख्या घुंगुरडयाला । ते साधणे कठीण ॥५८॥

परि जो का असे परिस । तो सुवर्ण करी लोखंडास । उरवी न त्याच्या ठायीं दोष । लोहपणाचा येतुला हो ॥५९॥

आपुली लीला कस्तुरी । मम वाणी मृत्तिका खरी । परि मान पावेल भुमिवरी । सहावासें या कस्तुरीच्या ॥१६०॥

माझें भाग्य धन्य धन्य । म्हणून तुमचे पाहिले चरण । आतां न द्यावे लोटून । परत दासगणूला ॥६१॥

सर्वदा सांभाळ माझा करा । दैन्यदुःखातें निवारा । भेटवा मशीं शारंगधरा । भक्त बापुन्याच्यापरी ॥६२॥

आपल्या कृपेकरुन । सानंद राहो सदा मन । सर्वदा घडो हरिस्मरण । तैसीच संगत सज्जनांची ॥६३॥

अव्याहत वारी पंढरीची । मम करे व्हावी साची । आवड सगुण भक्तीची । चित्ता ठायी असू द्या ॥६४॥

अंत घडो गोदातीरीं । याविण आशा नाहीं दुसरी । स्मृती राहो जागृत खरी । भजन हरींचें करावया ॥६५॥

भजन करीतां मोक्ष घडो । देह गोदातीरीं पडो । सद्भक्तांसी स्नेह जडो । दासगणूचा सर्वदा ॥६६ ॥

मागितलें तें मला द्यावे । तैसें लोकांचेही पुरवावे ।आर्त गुरुवरा मनोभावे । जे या स्तोत्रा पठतील ॥६७॥

या स्तोत्राचा पाठ जेथ । भाव होईल तेथ तेथ । तेथें न राहो कदा दुरित । इतुलेही दयाळा ॥६८॥

स्तोत्रपठकां उत्तम गती । तैशी संतती संपत्ती । धर्मवासना त्यांच्या चित्तीं । ठेवा जागृत निरंतर ॥६९॥

भूतबाधा भानामती । व्हावी न स्तोत्रपठकांप्रती । लौकिक त्याचा भूवरती । उत्तरोत्तर वाढवावा ॥१७०॥

हें स्तोत्र ना अमृत । होईल अवघ्या भाविकांप्रत । येईल त्याची प्रचित । सद्भाव तो ठेविल्या ॥७१॥

मोठयानें करुन गर्जना । बहावे साधू गजानना । शेगांवचा योगीराणा । सर्वदा पावो तुम्हातें ॥७२॥

सद्गुरुने चित्तास । पहा माझ्या करुन वास । बोलविलें या स्तोत्रास तुमच्या हिताकारणें ॥७३॥

यातें असत्य मानल्यास । सुखाचा तो होईल नाश । भोगीत रहाल संकटास । वरचेवर अभक्तीनें ॥७४॥

अभक्ती ती दूर करा । गजाननाशी मुळीं न विसरा । त्याच्या चरणीं भाव धरा । म्हणजे जन्म सफल होई ॥७५॥

स्तोत्रपठकांची आपदा । निमेल कीं सर्वदा । दृढ चित्तीं धरा पदां । गजानन साधूच्या ॥७६॥

वाचें म्हणता गजानन । व्याधी जातील पळून । जैसे व्याघ्रा पाहून । कोल्हे लांडगे पळती की ॥७७॥

स्तोत्रपठका भूमीवरी । कोणी न राहील पहा वैरी । अखेर मोक्ष त्याच्या करी । येईल कीं निःसंशय ॥७८॥

शके अठराशें अड्डुसष्टांत । श्रीक्षेत्र शेगांवात । समाधीपुढे मंडपांत । रचियेलें स्तोत्र पहा ॥७९॥

फाल्गुन वद्य एकादशी । मंगळवार होता त्या दिवशीं । स्तोत्र गेले कळसासी । गजाननाच्या कृपेने ॥१८०॥

शांति शांति त्रिवार शांति । असो या स्तोत्राप्रती । स्वामी गजानन गुरुमूर्ती । आठवा म्हणे दासगणू ॥१८१॥

॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

॥ इति श्रीसंत गजानन प्रार्थना स्तोत्र समाप्त ॥

* * *

## ❊ श्री. गजानन महाराज प्रगट दिन उत्सवाबद्दल थोडेसे ❊

नोव्हेंबर महिना उजाडला कि, सर्व भक्त मंडळींच्या मनात एकच ध्येय समोर असते. श्री. महाराजांच्या येणाऱ्या प्रगट दिन उत्सवाचे! आता फक्त काहीच महिने उरले आहेत आणि त्यात एवढा मोठा उत्सव, त्याची तयारी करायची आहे, किती कामे आहेत, नाही का? असे सगळे विचारचक्र सुरु असते. त्यासाठी अनेक तुकड्या तयार करण्यापासून, निरनिराळ्या बैठका घेण्यात येतात, तयारी जोरात सुरु होते. अनेक भक्तांच्या अथक परिश्रमानंतर प्रगट दिनाच्या दिवशी पहाटे पासून सेवेकऱ्यांची धावपळ सुरु होते. एवढा मोठा उत्सव सुरळीत पार पडावा हीच सर्वांची मनापासून इच्छा असते. उत्सवाची सुरुवात श्री महाराजांच्या भूपाळी आरतीने होते. त्यानंतर श्री. महाराजांचा अभिषेक करण्यात येतो. शृंगार सेवा अतिशय प्रसन्न करणारी असते. भक्तांचे मंदिरात आगमन होऊ लागते. श्री गजानन सेवा - दर महिन्यात नामस्मरण कार्यक्रमाच्या रुपरेषेप्रमाणे - नामस्मरणाने सुरवात होते. छोटे छोटे बाळ गोपाळ भारतीय संस्कृतीचे पुढील पिढीचे सेवेकरी बागडत असतात. ढोल, ताशे, लेझीम, छत्र, चामर ह्यांनी सज्ज अशी महाराजांची पालखी दिमाखात निघते. मराठी संस्कृतीचे प्रतीक असलेले लेझीम, फुगड्या पालखी सोहळ्याला बहार आणतात. सर्व वातावरण दुमदुमून जाते. त्यानंतर महाराजांची आरती आणि दर्शनासाठी भक्तांची रीघ लागते. दर्शनानंतर सेवेकऱ्यांनी तयार केलेल्या महाप्रसादाचे सर्व भक्तांना वाटप होते. ह्या उत्सवाचे स्वरूप असे काही असते कि जणू काही शेगांवच बे एरिया मध्ये अवतरले आहे असा सतत भास होत होतो.

* * *

# उत्सव आरती

## ✻ श्री गणपतीची आरती ✻

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची।
कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ।।१।।
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती।
दर्शनमात्रें मनकामना पुरती ।।धृ।।
रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा।
चंदनाची उटी कुंकुम केशरा।
हिरेजडित मुकुट शोभतो बरा।
रूणझुणती नूपुरें चरणी घागरिया ।।२।।
लंबोदर पितांबर फणिवरवंदना।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना।
दास रामाचा वाट पाहे सदना।
संकटीं पावावें निर्वाणीं रक्षावे सुरवरवंदना ।।३।।

## ✻ श्री पांडुरंगाची आरती ✻

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा।
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा।
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा।
चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ।।१।।
जय देव जय देव जय पांडुरंगा।
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा ।।धृ।।
तुळसीमाळा गळा कर ठेऊनी कटी।
कासे पीतांबर कस्तुरी लल्लाटी।
देव सुरवर नित्य येती भेटी।
गरुड हनुमंत पुढे उभे राहती ।।२।।

✻ ✻ ✻

धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा।
सुवर्णाची कमळे वनमाळा गळा।
राही रखुमाई राणीया सकळा।
ओवाळीती राजा विठोबा सावळा ।।३।।
ओवाळू आरत्या कुर्वंड्या येती।
चंद्रभागेमध्ये सोडुनिया देती।
दिंड्या पताका वैष्णव नाचती।
पंढरीचा महिमा वर्णावा किती ।।४।।
आषाढी कार्तिकी भक्तजन येती।
चंद्रभागेमध्ये स्नाने जे करिती।
दर्शन हेळामात्रे तया होय मुक्ती।
केशवासी नामदेव भावे ओवाळीती ।।५।।
श्री......... स...म..र्थ सद्गुरुनाथ... महाराज की जय

## ❊ श्री गजानन महाराजांची आरती ❊

जय जय सतचित् स्वरूपा स्वामी गणराया।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया।। जयदेव जयदेव ।।धृ।।
निर्गुण ब्रह्म सनातन अव्यय अविनाशी। स्थिरचर व्यापून उरले जे या जगतासी।
ते तू तत्त्व खरोखर नि:संशय अससी। लीलामात्रे धरिले मानव देहासी।।
जयदेव जयदेव ।।१।।
होऊ न देशी त्याची जाणिव तू कवणा। करूनी 'गणि गण गणांत बोते' या भजना।
धाता हरिहर गुरूवर तूचि सुखसदना। जिकडे पहावे तिकडे तू दिससी नयना ।।
जयदेव जयदेव ।।२।।
लीला अनंत केल्या बंकट सदनास। पेटविले त्या अग्नीवाचूनि चिलमेस।
क्षणांत आणिले जीवन निर्जल वापीस। केला ब्रह्मगिरीच्या गर्वाचा नाश।।
जयदेव जयदेव ।।३।।

व्याधी वारून केलें कैका संपन्न। करविले भक्तालागी विठ्ठल दर्शन।
भवसिंधू हा तरण्या नौका तव चरण। स्वामी दासगणूचे मान्य करा कवन।।
जयदेव जयदेव ।।४।।
श्री......... स...म..र्थ सद्गुरुनाथ... महाराज की जय

**अनंतकोटी ब्रह्माण्डनायक महाराजाधिराज योगिराज**
**परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी**
**समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय।।**

## * कर्पूरारती *

कर्पूरगौरं करुणावतारं संसारसारं भुजगेन्द्रहारम्।
सदा वसन्तं हृदयारविन्दे भवं भवानीसहितं नमामि॥
मंदार माला, कपालकाय। कपालमाला शिवशंकराय।
दिगंबरायै च दिगंबराय । नमः शिवायै च नमः शिवाय।
कर्पूर निरांजन धुपम दीपम समर्पयामी ।।

* * *

## ✻ घालीन लोटांगण ✻

घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यांनि पाहीन रूप तझे।
प्रेमें आलिंगिन आनंदे पूजिन। भावें ओवाळीन म्हणे नामा ।।१।।

त्वमेव माता पिता त्वमेव। त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव। त्वमेव सर्वं मम देवदेव ।।२।।

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा। बुध्द्यात्मना वा प्रकृतिस्वभावात्।
करोमि यद्यत् सकलं परस्मै। नारायणायेति समर्पयामि ।।३।।

अच्युतं केशवं रामनारायणं। कृष्णदामोदरं वासुदेवं हरी ।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं। जानकीनायकं रामचंद्रं भजे ।।४।।

हरे राम हरे राम, राम राम हरे हरे।
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे।।

## ✻ मंत्रपुष्पांजली ✻

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्। ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वेसाध्याः सन्ति देवाः।। ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे। स मे कामान्कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु। कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः।। ॐ स्वस्ति। साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्या ईस्या्त् सार्वभौमः सार्वायुष आन्तादापरार्धात्। पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराळिती। तदप्येषः श्लोकोऽभिगीतो मरूतः परिवेष्टारो मरूत्तस्यावसन् गृहे। आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति।।

✻ ✻ ✻

# ✻ गायत्री मंत्र ✻

ॐ एकदन्ताय विद्महे, वक्रतुण्डाय धीमहि,तन्नो दन्तिः प्रचोदयात् ॥

ॐ महालक्ष्म्यै च विद्महे, विष्णूपत्न्यै च धीमहि तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात् ॥

ॐ नारायणाय विद्महे, वासुदेवाय धीमहि तन्नो विष्णुः प्रचोदयात् ॥

ॐ तत्पुरुषाय विद्महे, महादेवाय धीमहि तन्नो रुद्रः प्रचोदयात् ॥

ॐ दिगंबराय च विद्महे, अत्रिपुत्राय धीमहि तन्नो दत्तः प्रचोदयात् ॥

ॐ दिगंबराय च विद्महे, गण गण गणांत बोते च धीमहि तन्नो
सद्गुरु गजाननः प्रचोदयात् ॥

ॐ भक्तवरदाय विद्महे, पांडुरंगाय धीमहि तन्नो कृष्णः प्रचोदयात् ॥

॥ मंत्र पुष्पांजलीम समर्पयामी ॥ नमस्कारम करोमी ॥

✻ ✻ ✻

# ✻ प्रार्थना ✻

सदा सर्वदा योग तुझा घडावा।
तुझे कारणी देह माझा पडावा।।
उपेक्षूं नको गुणवंता अनंता।
रघुनायका मागणें हेंचि आतां।।
उपासनेला दृढ चालवावें।
भुदेव-संतासि सदा नमावें।।
सत्कर्मयोगें वय घालवावें।
सर्वामुखी मंगल बोलवावें।।

ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे।
त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे।।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी।
तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

गजानना...गुणागरा......परम मंगला पावना ।
आशीव अवघे हरी, ...... दुरीत तेवि दुर्वासना ।।
नसे त्रिभुवनामधे ...... तुजविण आम्हा आसरा ।
करी पदनतावरी ...... बहु दया न रोषा धरा ।।१।।
निरालसपणे नसे......घडलि अल्प सेवा करी ।
तुझी पतितपावना ......भटकलो वृथा भूवरी ।
विसंबत न गाय ती ......आपुलिया कधीं वासरा ।
करी पदनातावरी ......बहु दया न रोषा धरा ।।२।।

अलास जगी लावण्या.......परतुनी सु-वाटे जन ।
समर्थ गुरूराज ज्या.......भुषवी नाम नारायण ।।
म्हणून तुज प्रार्थना.......सतत जोडूनिया करा ।
करी पदनतावरी.......बहु दया न रोषा धरा ।।३।।
क्षणांत जल आणिलें.......नसून थेंब त्या वापिला ।
क्षणांत गमनाप्रती.......करिसि इच्छिलेल्या स्थळा ।
क्षणांत स्वरूपे किती.......विविध धरिसी धीवरा ।
करी पदनतावरी.......बहु दया न रोषा धरा ।।४।।
अगाध करणी तुझी .......गुरूवरा न लोकां कळे।
तुला त्यजुनी व्यर्थ ते.......आचरितात नाना खुळे ।
कृपा उदक मागती.......त्यजुनी गौतमीच्या तिरा ।
करी पदनतावरी.......बहु दया न रोषा धरा ।।५।।
समर्थ स्वरूपप्रती.......धरून साच बाळापुरी ।
तुम्ही प्रगट जाहलां.......सुशिल बाळकृष्णा घरीं ।
हरिस्वरूप घेऊनी.......दिधली भेट भीमातिरा ।
करी पदनतावरी.......बहु दया न रोषा धरा ।।६।।
सच्छिद्र नौकेप्रती.......त्वदिंय पाय हे लागतां ।
जलात बुडता तरी.......तिजसी नर्मदा दे हाता ।
अशा तुजसि वाणण्या.......नच समर्थ माझी गिरा ।
करी पदनतावरी.......बहु दया न रोषा धरा ।।७।।
अतां न बहु बोलतां.......तव पदांबुजा वंदितों ।
पडो विसर ना कदा.......मदिय हेंचि मी मागतों ।
तुम्ही वरद आपुला.......कर धरा गणूच्या शिरा ।
करी पदनतावरी .......बहु दया न रोषा धरा ।।८।।

यानि कानि च पापानि जन्मान्तरकृतानि च।
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिणां पदे पदे।।

आवाहनं न जानामि न जानामि तवार्चनम।
पूंजा चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वर।।

मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर।
यत्पूजितं मया देव परिपूर्णं तदस्तु मे।।

अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम।
तस्मात्कारुण्यभावेन रक्ष रक्ष परमेश्वर।।

अचिंत्य जगताप्रती कृति तुझी न कोणा कळे ।
असो खलहि केवढा तव कृपे सुमार्गी वळे ।।
उणें पुढति ये तुझ्या खचित रत्नचिंतामणी ।
शिरीं सतत माझिया वरदहस्त ठेवा झणीं ।।

।। श्री समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय ।।


हे पूर्ण ब्रह्म जगचालक ज्ञानराशी । ऐसे युगायुगी किती अवतार घेसी ।
झाल्यास दर्शन तुझे, भय रोग चिंता । नासे गजाननगुरो, मज पाव आता ।।

।। श्री समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय ।।

**अनंतकोटी ब्रह्माण्डनायक महाराजाधिराज योगिराज**
**परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी**
**समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय।।**

* * *

# श्री गजानन महाराज



शेगांव, महाराष्ट्र

# संस्थेविषयी थोडेसे...

शेगांवचे संत शिरोमणी श्री गजानन महाराजांची  निःस्वार्थ भक्ती हा या संस्थेचा मुख्य हेतू आहे. त्याच बरोबर आपला हा गुरुभक्तीचा समृद्ध वारसा पुढील पिढी पर्यंत पोहोचवता यावा ह्यासाठी संस्था सातत्याने कार्य करीत आहे. ह्या सेवा कार्यात अनेक प्रकारे हातभार लावता येऊ शकतो.

श्री गजानन सेवा संस्थेचे उत्सव:

१) श्री गजानन महाराज प्रगट दिन (माघ वाद्य सप्तमी)
२) श्री गुरुपौर्णिमा
३) श्री गजानन महाराज पुण्यतिथी उत्सव (ऋषिपंचमी)

श्री गजानन सेवा - उपक्रम:

१) श्री गजानन महाराज गुरुवार अभिषेक पूजा
२) श्री गजानन महाराज मासिक उपासना
३) गरजूंना अन्नदान सेवा
४) गरजू मुलांना खेळणी वाटप

अधिक माहितीसाठी संस्थेला संपर्क करावा

# श्री गजानन सेवा


सॅन-फ्रान्सिस्को बे एरिया, कॅलिफोर्निया, अमेरिका

https://shrigajananseva.org
info@shrigajananseva.org


श्री गजानन सेवा ही अमेरिकेतील नोंदणीकृत सेवाभावी 501(c)(3) संस्था आहे.